सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. ०४ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १४० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

भारत-बेल्जियम संबंधांना नवी दिशा; पंतप्रधान मोदी-डी वेव्हर यांच्यात संरक्षण, ऊर्जा सहकार्यावर चर्चा

नवी दिल्ली : भारत युरोपीय संघ (इयू) आणि युरोपसोबतचे आपले संबंध अधिक मजबूत करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी बेल्जियमचे पंतप्रधान बार्ट डी वेव्हर यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांची ही भेट राजधानीतील हैदराबाद हाऊसमध्ये झाली. यापूर्वी पंतप्रधान डी वेव्हर यांनी राजघाट येथे महात्मा गांधींना श्रद्धांजली वाहिली. त्यांनी पुष्पहार अर्पण करून महात्मा गांधींना आदरांजली दिली. बेल्जियमच्या पंतप्रधानांनी राजघाट येथील अभ्यागत पुस्तिकेतही स्वाक्षरी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी सांगितले की, भारत आणि बेल्जियममधील संबंध पारंपरिक सहकार्याच्या क्षेत्रांच्या पलीकडे जाऊन संरक्षण आणि स्वच्छ ऊर्जा यांसारख्या धोरणात्मक क्षेत्रांपर्यंत विस्तारले आहेत. त्यांनी 'जोरावर' रणगाडा आणि आंध्र प्रदेशातील मोठ्या ग्रीन अमोनिया प्रकल्पातील सहकार्याचा उल्लेख केला. बेल्जियमचे पंतप्रधान बार्ट डी वेव्हर यांच्यासोबत संयुक्त निवेदन देताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "आज आपल्या सहकार्याची व्याप्ती पारंपरिक क्षेत्रांच्या पलीकडे जाऊन संरक्षण आणि स्वच्छ ऊर्जा यांसारख्या धोरणात्मक क्षेत्रांपर्यंत पोहोचली आहे. आम्ही 'जोरावर' रणगाड्यासारख्या आधुनिक संरक्षण उपकरणांवर एकत्रितपणे काम करत आहोत. तसेच आंध्र प्रदेशातील काकीनाडा येथे जगातील सर्वात मोठ्या ग्रीन अमोनिया प्रकल्पांपैकी एका प्रकल्पाची उभारणी करत आहोत." दोन्ही देशांमधील संबंधांच्या ऐतिहासिक महत्त्वावरही त्यांनी भर दिला. ते म्हणाले, "भारत आणि बेल्जियमचे संबंध इतिहासात खोलवर रुजलेले आहेत. पहिल्या महायुद्धाच्या काळात बेल्जियममध्ये हजारो भारतीय सैनिकांनी दाखवलेले शौर्य आणि दिलेले बलिदान हा आपल्या सामायिक स्मृतींचा महत्त्वाचा भाग आहे. आज लोकशाही

मूल्ये, बाजाराधारित अर्थव्यवस्था आणि नागरिकांमधील मजबूत संबंध यामुळे आपण नैसर्गिक भागीदार बनलो आहोत."

भारत आणि युरोपीय संघादरम्यान झालेल्या मुक्त व्यापार कराराचे (FTA) कौतुक करताना पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, दोन्ही देशांनी गुंतवणुकीला चालना देण्यासाठी 'फास्ट-ट्रॅक यंत्रणा' उभारली आहे.ते म्हणाले, "यावर्षीच्या सुरुवातीला भारत आणि युरोपीय संघादरम्यान ऐतिहासिक मुक्त व्यापार करार (FTA) अंतिम करण्यात आला. जगातील दोन सर्वात मोठ्या लोकशाही शक्तींमधील हे अभूतपूर्व सहकार्य जागतिक स्थैर्य, विकास आणि सामायिक समृद्धीला आणखी बळकटी देईल. भारताची सातत्यपूर्ण आर्थिक प्रगती आणि या करारामुळे आपल्या आर्थिक संबंधांसाठी नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. आज या संधींचे ठोस परिणामांमध्ये रूपांतर करण्यासाठी आम्ही अनेक महत्त्वाची पावले उचलली आहेत. 'भारत-बेल्जियम बिझनेस फोरम'ला नियमित व्यवस्था बनवण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. दोन्ही देशांमधील वित्तीय, फिनटेक आणि नियामक संस्थांमधील समन्वय वाढवण्यात येईल. या उपाययोजनांच्या माध्यमातून पुढील पाच वर्षांत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करण्याचे उद्दिष्ट आम्ही ठेवले आहे."

पंतप्रधान मोदी म्हणाले, "आज आम्ही दोन्ही देशांतील स्टार्टअप्समधील संबंध अधिक मजबूत करण्यास आणि सागरी क्षेत्रातील क्षमता वाढवण्यास सहमती दर्शवली आहे. विद्यापीठे आणि संशोधन क्षेत्रातील सहकार्यही अधिक मजबूत केले जाईल. प्रतिभावान मनुष्यबळाची ये-जा सुलभ करण्यासाठी लवकरच 'मायग्रेशन अँड मोबिलिटी पार्टनरशिप ॲग्रीमेंट'वर स्वाक्षरी केली जाईल." "आज आम्ही प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवरही सविस्तर चर्चा केली.

उरुसानिमित्त खुलताबाद न.प. तर्फे चादर अर्पण
पारंपरिक चादर मिरवणुकीत सर्वधर्मीय एकतेचे दर्शन

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी खुलताबाद ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेल्या खुलताबाद शहरात हजरत ख्वाजा शेख मुन्तजीबोद्दीन जर जरी जर बक्ष यांच्या ७४० व्या वार्षिक उरुसानिमित्त खुलताबाद नगरपरिषदेच्या वतीने सालाबादप्रमाणे चादर मिरवणूक उत्साहात काढण्यात आली. भाविक वातावरणात निघालेल्या या मिरवणुकीत सर्वधर्मीय एकता आणि सामाजिक सलोख्याचे दर्शन घडले.

दर्गा हजरत शेख बाबा बुरहनोद्दीन अवलिया यांच्या दर्ग्यासमोरून पारंपरिक पद्धतीने चादर मिरवणुकीस प्रारंभ झाला. वैजापूर येथील प्रसिद्ध 'चाऊस बँड बाजा' हे मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण ठरले. बँडच्या पारंपरिक सुरांच्या तालावर निघालेल्या मिरवणुकीमुळे परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

मिरवणुकीत सहभागी पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी पारंपरिक फेटे परिधान केले होते. रंगीबेरंगी फेट्यांमुळे मिरवणुकीला विशेष शोभा आली. या पारंपरिक वेशभूषेने नागरिकांचे आणि भाविकांचे लक्ष वेधून घेतले.

यावेळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शेख समीर, नगराध्यक्ष आमेर पटेल, दर्गाह कमिटीचे अध्यक्ष एजाज अहमद, कार्यालयीन अधीक्षक रुस्तुम फुलारे, नगरसेवक अनिस जागीरदार, शेख तौसीफ अहमद, आयाज बेग, एस. एम. कमर, दर्गा कमिटीचे सचिव मतीन जागीरदार, नगरसेवक शेख सलीमोद्दीन, शेख वाजेद, शेख अमान, , शेख अनवर, डॉ. मोईनोद्दीन कादरी पाणीपुरवठा इंजिनियर श्रीहरी चौडेकर., मुख्य लिपिक अंकुश भराड पाटील जितेंद्र बोचरे, मुख्य लेखपाल किशोर मोरे सुभाष चव्हाण मनीषा लघाने संतोष भालेराव काशीम बेग शेख , मुबशीरोद्दीन, शेख कामरानोद्दीन, गुलाम मोईनोद्दीन, आप्पाराव देवकर, , कासिम बेग, शेख आतिफ, अशोक भंडारे, संजय सोंडवाल, मंगलबाई बावस्कर , अखिलोद्दीन, सतीश भालेराव, अजहर शेख, शुभम देवकर, , संतोष आव्हाड, लक्ष्मण शेजुवळ, सय्यद वसीम, खास पटेल यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

उरुसानिमित्त आयोजित करण्यात आलेली ही चादर मिरवणूक धार्मिक परंपरा, सामाजिक सलोखा आणि सर्वधर्मीय ऐक्याचे प्रतीक म्हणून ओळख असून. मिरवणुकीत नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.

एकामागून एक 4 मुलांचा रहस्यमय मृत्यू

मध्य प्रदेश : मध्य प्रदेशातील शिवपुरी जिल्ह्यातून एक मन हेलावून टाकणारी आणि अत्यंत रहस्यमय घटना समोर आली आहे. एका कुटुंबातील १६ सदस्य पिकनिकसाठी धबधब्यावर गेले होते, मात्र तिथून परतल्यानंतर उद्भवलेल्या अनाकलनीय आजारपणामुळे अवघ्या १० दिवसांच्या कालावधीत कुटुंबातील चार निष्पाप मुलांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये तीन सख्ख्या भावांचा आणि एका नातेवाईकाच्या मुलाचा समावेश आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, सध्या कुटुंबातील इतर तीन मुलींची प्रकृतीही अत्यंत चिंताजनक असल्याने प्रशासनाची धावपळ उडाली आहे.

शिवपुरी येथील फिजिकल पोलीस ठाण्याच्या परिसरातील रहिवासी तन्वीर अहमद यांचे कुटुंब आणि काही नातेवाईक १६ ऑगस्ट रोजी गोरा टिला येथील धबधब्यावर पर्यटनासाठी गेले होते. दिवसभर आनंद लुटल्यानंतर सर्वजण घरी परतले, परंतु काही वेळातच या आनंदाचे रुपांतर भीषण संकटात झाले. कुटुंबातील लहान मुलांना अचानक तीव्र ताप, पोटदुखी आणि अतिसाराचा (उलट्या-हगवण) त्रास सुरू झाला. सर्वात आधी १४ वर्षीय ताहिरची तब्येत खालावल्याने त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

महायुतीच्या जलनीतीने अहिल्यानगरचा दुष्काळमुक्तीचा संकल्प प्रत्यक्षात!
मंत्री विखे पाटील यांच्या प्रयत्नातून सिंचन विकासाचा समतोल

शिर्डी (प्रतिनिधी) : वर्षानुवर्षे दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्याच्या जलसमृद्ध भविष्याची पायाभरणी महायुती सरकारच्या काळात होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तसेच जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जिल्ह्यातील रखडलेल्या आणि महत्त्वाकांक्षी सिंचन प्रकल्पांना मंजुरी तसेच भरीव निधी मिळत आहे. त्यामुळे 'दुष्काळी जिल्हा' ही ओळख बदलून 'सिंचनसमृद्ध अहिल्यानगर' निर्माण करण्याच्या दिशेने निर्णायक वाटचाल सुरू झाली असून, सिंचन विकासाचा समतोल साधला जात आहे.

कुकडी प्रकल्पाला ५,७०४ कोटींचा ऐतिहासिक निधी

महायुती सरकारने अहिल्यानगरच्या दुष्काळी पट्ट्यासाठी कुकडी प्रकल्पाला ५,७०४ कोटी रुपयांचा ऐतिहासिक निधी मंजूर केला आहे. या प्रकल्पातून अहिल्यानगरसह पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांतील तब्बल १,४४,९१२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. डिंभे-माणिकडोह हा सुमारे १६ किलोमीटरचा बोगदा या प्रकल्पातील महत्त्वाचा घटक असून, त्याच्या उभारणीमुळे पाण्याच्या उपलब्धतेला मोठी चालना मिळणार आहे. कुकडी प्रकल्पात येडगाव, माणिकडोह, वडज, डिंभे आणि पिंपळगाव जोगे या पाच धरणांचा समावेश असून, त्यांची एकूण पाणीसाठा क्षमता ३०.५२ टीएमसी आहे. मंजूर रकमेत ४,९४६.२० कोटी रुपये प्रत्यक्ष कामांसाठी, तर ७५८.३० कोटी रुपये अनुषंगिक खर्चासाठी वापरण्यात येणार आहेत. गेली अनेक वर्षे दक्षिण भागातील तालुक्यांवर पाण्याच्या बाबतीत मोठा अन्याय झाला. 'अहिल्यानगर विरुद्ध पुणे' असा पाण्याचा संघर्ष सातत्याने सुरू राहिला. मात्र, कुकडीच्या लाभक्षेत्रातील दुष्काळी भागांच्या न्याय्य हक्कासाठी सकारात्मक विचार करून निर्णय घेण्यात आला नाही, ही वस्तुस्थिती आहे.मात्र, राज्यात महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर जलसंपदा विभागाची जबाबदारी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आली. त्यांनी उत्तर आणि दक्षिण भागातील सिंचन प्रकल्पांच्या कामांना गती दिली.

फोनवर बोलण्यावरून वैद्यकीय अधिकाऱ्याला मारहाणीचा प्रयत्न
घरासमोर फोनवर का बोलता? असा जाब विचारत दोघांचा गोंधळ

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.०३ सप्टेंबर - घरासमोर उभे राहून फोनवर बोलत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याला 'इथे काय बोलत उभे राहिला?' असा जाब विचारत वाद घालून मारहाणीचा प्रयत्न केल्याची घटना औराळा येथे घडली. याप्रकरणी संतोष जयस्वाल व एका अल्पवयीनाविरुद्ध देवगाव रंगारी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सौरभ भिवलाल राठोड (वय २७, रा. शिवाजी कॉलेज रोड, कन्नड) हे औराळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. फिर्यादीनुसार, सोमवारी (३१ ऑगस्ट) दुपारी साडेबाराच्या सुमारास प्राथमिक आरोग्य केंद्रातील बाह्यरुग्ण विभागाचे काम आटोपून ते औराळा-शिरूर बंगला मार्गाने जात होते.

यावेळी त्यांची दुचाकी बंद पडल्याने त्यांनी ती रस्त्याच्या कडेला उभी केली. त्यानंतर ते बहिणीशी दूरध्वनीवर बोलत असताना रस्त्यालगतच्या घरातील संतोष जयस्वाल व एका अल्पवयीनाने त्यांच्याकडे येऊन 'आमच्या घरासमोर उभे राहून फोनवर का बोलत आहात?' असा जाब विचारला. त्यानंतर वाद वाढून दोघांनी राठोड यांना मारहाण करण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या घटनेप्रकरणी देवगाव रंगारी पोलिस ठाण्यात संतोष जयस्वाल व एका अल्पवयीनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास डब्ल्यू. आर. कांबळे व पोलिस अंमलदार सोनू गायकवाड करीत आहेत.

शालार्थ आयडी घोटाळ्यात आतापर्यंत आठ जण अटकेत

मुंबई : सुमारे १६० कोटी रुपयांच्या शालार्थ आयडी घोटाळ्यात रोज नवे खुलासे होत आहेत. धुळ्यातील साक्री येथील न्यू इंग्लिश स्कूलचा लॅब असिस्टंट तुषारकुमार साळुंके याला या प्रकरणात अटक करण्यात आली आहे. नाशिक जिल्हा न्यायालयाने (Nashik District Court) त्याला ७ सप्टेंबरपर्यंत म्हणजेच पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासानुसार, संगणकीय ज्ञानाचा गैरवापर करत साळुंकेने संस्थाचालक आणि संशयित मध्यस्थ प्रशांत वाडीले याच्यासोबत संगनमत करून विविध शिक्षण संस्थांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे बनावट शालार्थ आयडी तयार निष्पन्न झाले आहे. बनावट मान्यता आणि आदेश मिळवण्यासाठी तत्कालीन शिक्षणाधिकारी आणि वेतन पथक अधिकाऱ्यांशी आर्थिक व्यवहार झाल्याचेही तपासात समोर आले आहे. तपासात उघड झालेल्या माहितीनुसार, तुषार साळुंके याला संगणकाचे ज्ञान असल्याने त्याने या घोटाळ्यात मुख्य तांत्रिक सूत्रधाराची भूमिका बजावली. त्याने शिक्षण संस्था चालक व संशयित मध्यस्थ प्रशांत वाडीले याच्याशी संगनमत करून तब्बल पाच ते सहा शिक्षण संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे बेकायदेशीर शालार्थ आयडी तयार केले.

गणेशोत्सवासाठी मनपाची जय्यत तयारी; मिरवणूक मार्गावरील खड्डे तातडीने बुजविण्याचे निर्देश
मंडप परवानगीसाठी एक खिडकी योजना; विसर्जन विहिरी, कृत्रिम तलाव व प्रकाशयोजनेचा आढावा

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी महापौर समीर राजूरकर यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी गणेशोत्सव पूर्वतयारी बैठक घेण्यात आली. यावेळी मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजविणे, गणेश मंडळांना मंडपासाठी परवानगी, विसर्जन व्यवस्था, स्वच्छता व प्रकाशयोजनेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, सभागृह नेते गोविंद केंद्रे, नगरसेवक ऋषिकेश जयस्वाल, मनपा आयुक्त अमोल येडगे,

अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, कल्पिता पिंपळे, शहर अभियंता संजय कोंबडे यांच्यासह कार्यकारी अभियंते, उपअभियंते व संबंधित अधिकारी उपस्थित होते. गणेशोत्सवाच्या काळात मिरवणूक मार्गावर नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी खड्डे बुजविणे व पॅचवर्कची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. संबंधित वार्ड अभियंत्यांनी प्रत्यक्ष स्थळी पाहणी करून कामाची गुणवत्ता तपासावी आणि दर्जेदार काम पूर्ण झाल्याची खात्री करावी, असे निर्देश महापौर व पदाधिकाऱ्यांनी दिले.

सार्वजनिक गणेश मंडळांना मंडप उभारणीसाठी तात्पुरत्या परवानग्या देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या एक खिडकी योजनेचाही आढावा घेण्यात आला. तसेच विसर्जन विहिरींची स्वच्छता, गाळ काढणे, कृत्रिम विसर्जन तलावांची व्यवस्था आणि गरज असलेल्या नवीन ठिकाणी कृत्रिम तलाव उभारण्याबाबत चर्चा करण्यात आली. गणेशोत्सवाशी संबंधित सर्व कामांना आवश्यक प्रशासकीय मान्यता तातडीने पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले. विसर्जनाच्या ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्यास प्रक्रिया बाधित होऊ नये, यासाठी जनरेटरची व्यवस्था आणि पुरेशी प्रकाशयोजना करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. "मिरवणूक मार्ग, मंडप परवानगी, विसर्जन व्यवस्था, स्वच्छता आणि प्रकाशयोजना यामध्ये कोणतीही त्रुटी राहू नये. नागरिक व गणेश मंडळांना आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे," असे निर्देश आयुक्त अमोल येडगे यांनी दिले.

35 वर्षाच्या शासकीय सेवेनंतर नायब तहसीलदार बाबुराव दळवे सेवानिवृत्त

केज, प्रतिनिधी : मूळ चिंचोलीमाळी गावाचे रहिवासी असलेले सध्या धारूर तहसील कार्यालयात नायब तहसीलदार पदावर कार्यरत असलेले श्री बाबुराव दळवे हे महसूल विभागातील विविध पदावर सुमारे ३५ वर्ष प्रदीर्घ सेवा बजावून नियत वयामानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. तलाठी पदावर रुजू झालेले श्री दळवे हे शासनाच्या महसुली भागात काम करत नायब तहसीलदार या पदावरून सेवा निवृत्त झाले. शासकीय सेवेत असताना शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याचे मौलिक कार्य त्यांनी केले. त्यांची कार्य कुशलता शिस्तप्रियता, सहकार्याची भावना त्यामुळे अधिकारी व कर्मचारी लोकात त्यांचे सुलोख्याचे संबंध निर्माण केले, शासकीय कार्यात असताना त्यांनी अनेक पुरस्कार प्राप्त केले . सेवानिवृत्ती कार्यक्रमात उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दळवे यांच्या कार्याचे कौतुक करून सेवा काळातील आठवणीत उजळला दिला. यावेळी त्यांना निरोगी आयुष्य, आनंदी व सुखी जीवनाच्या शुभेच्छा दिल्या .

बनसारोळा येथे श्री गुरुपादुका मठातर्फे बगलामुखी, रुद्र, भैरव, चंडी भव्य महायागाचे आयोजन

केज : पावन श्रावण मासानिमित्त बनसारोळा ता.केज येथील श्री गुरुपादुका मठ यांच्या वतीने भव्य महाशक्ती महायागचे आयोजन करण्यात आले आहे. दि. 04 सप्टेंबर रोजी गोकुळ अष्टमी रोजी सकाळी 8 वा आदर्श विद्यालयाच्या शेजारील प्रांगणात या पवित्र हवन युक्त सेवेला प्रारंभ होणार आहे.या महाशक्ती महायागामध्ये माता बगलामुखी, रूद्र, भैरव व चंडी याग* एकत्रितपणे संपन्न होणार आहेत.

हा याग अध्यात्मिक प्रगतीसाठी,कौटुंबिक शांतीसाठी या यागाला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या पवित्र सेवेसाठी स्वामी भक्त गुरूवर्य सर्वज्ञेश्वर स्वामी महाराज यांच्यासह प्रवीण बासटवार, श्रद्धा घोडके, संगिता सौदागर, वंदना तट, राजपाल काकडे व सर्व स्वामीभक्तांनी पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे.

केज उपजिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय पोषण माहचे उद्घाटन

केज (प्रतिनिधी) : रुग्णालयात केज येथील उपजिल्हा रुग्णालयात त राष्ट्रीय पोषण माहचे उद्घाटन बुधवार रोजी झाले. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ केशव इंगोले यांनी उद्घाटन करून मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना ते म्हणाले उत्तम आरोग्यासाठी आहारात पालेभाज्यांचा अधिक समावेश करावा असे मत डॉ इंगोले यांनी व्यक्त केले.

आहारतज्ञ सुलक्षणा पाटील यांनी आहार प्रदर्शनी मांडणी केली. प्रदर्शनामध्ये आहाराविषयीचे मार्गदर्शन करणारे वेगवेगळे मॉडेल्स ठेवण्यात आले .गरोदर माता स्तनदा माता यांनी कसा आहार घ्यावा डायबिटीज किंवा इतर रुग्णांनी कसा आहार घ्यावा आपल्या सांड पाण्यातून कशी परसबाग फुलवावी त्याचप्रमाणे कोणत्या पदार्थातून कोणती पोषक तत्वे मिळतात याबाबत चार्ट लावण्यात आले. समतोल आहार कसा असावा याविषयी प्रदर्शनात येणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी डॉ सावंत बालासाहेब डॉ पाटील अजय डॉ श्रीमती नेहरकर, श्री सानप प्रशासकीय अधिकारी, श्रीमती पळशीकर मॅडम मॅटर, श्रीकृष्ण नागरगोजे रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी श्री यादव विजय,श्री बळीराम शिंदे व श्रीमती क्षीरसागर व श्रीमती जगताप व श्रीमती वाघमारे ,श्रीमती साळवे , श्रीमती जोगदंड , श्रीमती चव्हाण , श्रीमती भोपळे, श्रीमती कराड , श्रीमती जोशना केवटे , जयश्री लाटे,सीता गिरी, तानाजी तपसे आरोग्य विभागातील कर्मचारी, महिला,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंबाजोगाईत भरदिवसा जबरी चोरी; दुचाकीवरुन आलेल्या चोरट्यांनी महिलेचे सोन्याचे गंठण हिसकावले

अंबाजोगाई : रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका महिलेच्या गळ्यातील सुमारे १ लाख ५४ हजार रुपये किमतीचे २२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनीगंठण काळ्या रंगाच्या दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी बळजबरीने हिसकावून नेल्याची घटना घडली आहे. ही घटना मोरेवाडी परिसरातील जिजाऊनगर पाटीजवळ सायंकाळच्या सुमारास घडली.

पारिजात कॉलनी, अंबाजोगाई येथील रहिवासी आशा भारतराव चौधरी (वय ५५ वर्षे) या चनई येथे जाण्यासाठी मोरेवाडी परिसरातील जिजाऊनगर पाटीजवळ आपला मुलगा वाहन घेऊन येण्याची वाट पाहत उभ्या होत्या. त्यावेळी काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून दोन अज्ञात इसम पाठीमागून आले. दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या इसमाने आशा चौधरी यांच्या गळ्यातील गोपाची साखळी डिझाईन, दोन मंगळसूत्र आणि चार मणी असलेले २२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनीगंठण जोराने हिसका मारून तोडून घेतले आणि दोघेही सुसाट वेगाने पसार झाले. संबंधित चोरट्यांनी तोंडाला मास्क लावले होते, तसेच चालकाने पिवळ्या रंगाचा आणि पाठीमागे बसलेल्या इसमाने आकाशी रंगाचा शर्ट घातलेला होता. महिलेने आरडाओरड केल्यानंतर मुलासह चोरट्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला, मात्र ते पळून जाण्यात यशस्वी झाले. या प्रकरणी आशा भारतराव चौधरी यांच्या फिर्यादीवरून दोन अज्ञात इसमांविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०४ (स्नॅचिंग/जबरी चोरी) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रमेश भिव्हा घुले हे करीत आहेत.

मगरीच्या हल्ल्यामुळे गुरु द्रोणाचार्यांचा जीव धोक्यात

मुंबई : सोनी सबवरील हस्तिनापुर के वीर गुरुकुलात तरुण पांडव आणि कौरवांना मिळणाऱ्या महत्त्वाच्या शिकवणींचा प्रवास पुढे नेत आहे. गुरु द्रोणाचार्य (जितेन लालवानी) त्यांना नव्या आव्हानांतून घडवत असताना, तरुण राजकुमार आता अशा संकटाला सामोरे जात आहेत ज्यामुळे त्यांचा धैर्य आणि कौशल्याची खरी कसोटी लागणार आहे. आगामी भागांमध्ये, गावकरी गंगेजवळ झालेल्या मगरांच्या हल्ल्यांनंतर द्रोणाचार्यांकडे मदतीसाठी येतात. गुरु द्रोणाचार्य तरुण राजकुमारांना त्या परिसराची चौकशी करण्याचे, मगरांच्या हालचाली समजून घेण्याचे आणि हल्ले थांबवण्याचा मार्ग शोधण्याचे निर्देश देतात. मात्र, हे मिशन धोकादायक वळण घेते जेव्हा द्रोणाचार्य नदीत पडतात आणि त्यांच्यावर मगर हल्ला करतो. त्यांच्या गुरूचं जीवन धोक्यात आलं असताना, युधिष्ठिर (अथर खान) आणि अर्जुन (उर्वा सवाळिया) यांनी आपल्या गुरूला वाचवण्यासाठी तातडीने कृती करावी लागते.

जिल्ह्यातील सरकारी शाळेतील समस्यांकडे पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी लक्ष द्यावे : डॉ.संजय तांदळे

एसएफआय व डीवाय एफआय विद्यार्थी संघटनेच्या तिसऱ्या दिवशीच्याही आंदोलनाला प्रशासनाचे दुर्लक्ष

बीड (प्रतिनिधी) : एसएफआय विद्यार्थी संघटना आणि डीवायएफआय युवा संघटनेच्या वतीने बीड जिल्हा परिषदेच्या समोर दिनांक 1 सप्टेंबर 2026 पासून 'शाळा वाचवा,शाळा सुधारा' या राज्यव्यापी मोहिमेअंतर्गत बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. बीड जिल्हा परिषदेसमोर आंदोलनाचा आजचा तिसरा दिवस असून देखील प्रशासनाने अद्याप पर्यंत कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. दिनांक 3 सप्टेंबर 2026 गुरुवार रोजी आंदोलन स्थळी बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे अध्यक्ष डॉ संजय तांदळे यांनी भेट देऊन आंदोलनास पाठिंबा दिला.

या आंदोलनात डीवायएफआयचे राज्य अध्यक्ष मोहन जाधव, एसएफआयचे राज्य अध्यक्ष रोहिदास जाधव, डीवायएफआयचे जिल्हा अध्यक्ष सुहास झोडगे, जिल्हा सचिव विशाल देशमुख, शिवाजी चव्हाण, संगमेश्वर आंधळकर, सिद्राम सोळंके, इस्माईल शेख, सुनील शिंदे, अमोल स्वामी, डॉ. कुंडलीक खेत्री, दत्ता भोसले, समिर शेख, अक्षय शिंदे, रितेश चव्हाण, राहुल जाधव आदी उपस्थित होते. यावेळी आंदोलनास बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, डॉ. लक्ष्मण पवाळ, लेक लाडकी अभियानाचे जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे,मानवी हक्क अभियान जिल्हाध्यक्ष विष्णू मुजमुले आदींनी पाठिंबा दिला.

यावेळी आंदोलनात सहभागी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना डॉ. संजय तांदळे म्हणाले की, पशुसंवर्धन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री माननीय पंकजाताई मुंडे यांनी नुकतेच मंत्रालयात ऑनलाईन बैठक घेऊन जिल्हा परिषद शाळा मधील वर्ग खोल्या, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृहे,संरक्षण भिंत आदी बाबत वस्तूस्थिती पाहणी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली आहे.

वसतीगृह, आधार आणि स्वयंम योजनेच्या अर्जासाठी आता 15 सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

बीड, दि. 2 (जिमाका) :- शैक्षणिक वर्ष 2026-27 करीता बारावी नंतरच्या उच्चशिक्षणासाठी बिगरव्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना, आणि पंडित दीनदयाळ स्वयंम योजना भटक्या जमाती क-प्रवर्गासाठी या योजनांचे ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी दि.15 सप्टेंबर 2026 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.तरी पात्र विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज करावेत आणि या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

बीड नगरपरिषद हद्दीपासून 10 किलोमीटर अंतराच्या आतील कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी केवळ वसतीगृह योजनेसाठी अर्ज करावा. बीड तालुका वगळता जिल्ह्यातील इतर सर्व तालुक्यांमधील विद्यार्थ्यांनी फक्त आधार योजना आणि स्वयंम योजनेसाठी अर्ज सादर करावा. बीड तालुका सोडून इतर तालुक्यातील विद्यार्थ्यांनी वसतीगृहासाठी अर्ज करू नये. विद्यार्थ्यांना अर्जाबाबत काही अडचण असल्यास किंवा अधिक माहिती हवी असल्यास मुलांचे वसतीगृह गृहपाल भ्र. ९६०४६६७६१५ तर मुलींचे वसतीगृह गृहपाल भ्र. ९३२५३३३२२५ या क्रमांकांवर संपर्क साधता येईल. असेही कळविले आहे.

तुलसी शिक्षण समूह : परिवर्तनवादी विचारांचे चालते-बोलते विद्यापीठ

एसएनडीटी महिला विदयापीठ युवा महोत्सव 2026च्या निमित्ताने अनुभवलेली शैक्षणिक क्रांती

लेखक : डॉ. विनोद उपरवट
सिनेट सदस्य, एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई

काही कार्यक्रम आपण पाहतो, काही कार्यक्रम आपण अनुभवतो आणि काही कार्यक्रम आपल्या मनावर कायमस्वरूपी ठसा उमटवून जातात. एसएनडीटी युवा महोत्सव २०२६ हा माझ्यासाठी अशाच अविस्मरणीय अनुभवांपैकी एक ठरला. हा महोत्सव केवळ नृत्य, संगीत, कला, साहित्य आणि विविध सांस्कृतिक स्पर्धांचा सोहळा नव्हता; तर तो शिक्षण, संस्कार, स्वावलंबन, समता आणि परिवर्तनवादी विचारांची पेरणी करणारा एक व्यापक सामाजिक उपक्रम होता.

एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई आणि देवगिरी प्रतिष्ठान, बीड संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझायनिंग, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ विभागीय युवा महोत्सव २०२६मध्ये प्रमुख पाहुणा म्हणून उपस्थित राहण्याचा मला योग आला. या महोत्सवाच्या निमित्ताने तुलसी शिक्षण समूहाचे काम जवळून पाहण्याची आणि अनुभवण्याची संधी मिळाली. त्या अनुभवातून मनात एक विचार प्रकर्षाने उमटला—तुलसी हे केवळ एका महाविद्यालयाचे नाव नाही; तुलसी हा एक विचार आहे, एक चळवळ आहे आणि परिवर्तनवादी शिक्षणाची दिशा दाखवणारे चालते-बोलते विद्यापीठ आहे.

तुलसी नावामागची मातृशक्ती आणि परिवर्तनाची प्रेरणा

तुलसी शिक्षण समूहाचे सर्वेसर्वा प्रा. प्रदीपजी रोडे यांनी आपल्या आईच्या—तुलसी मातेच्या नावाने हे शैक्षणिक कार्य उभे केले. आईला केवळ नावापुरते जपण्याऐवजी त्या नावामागील संस्कार, ममत्व, त्याग आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी त्यांनी आपल्या शैक्षणिक कार्यातून जिवंत ठेवली आहे.

किर्तन हे प्रबोधनाचे प्रभावी माध्यम- ह.भ.प नाना महाराज

सावरकर मधील कीर्तन कार्यशाळेला उस्फुर्त प्रतिसाद

बीड (प्रतिनिधी) : किर्तन हे समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे. प्रत्येक कीर्तनकार हा प्रबोधनकारच असतो. संस्कारित समाज आणि पिढ्या घडवण्याचे काम कीर्तनाच्या माध्यमातून वर्षानुवर्ष होत आहे असे प्रतिपादन श्री संत बंकटस्वामी संस्थानचे ह.भ.प. नाना महाराज कदम यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय बीड व मराठवाडा महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 2 सप्टेंबर रोजी किर्तन कार्यशाळेचा समारोप झाला.या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. अश्विन रांजणीकर, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ. पि.के. कुलकर्णी, आदर्शगाव वंजारवाडीचे सरपंच वैजनाथ तांदळे,प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, प्राचार्य डॉ. सुधीर देशमुख, कार्यक्रमाधिकारी डॉ. दोवेदास नागरगोजे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ.रमेश खंडागळे हे उपस्थित होते. पुढे बोलताना नाना महाराज कदम म्हणाले की कीर्तनाच्या माध्यमातून समाज जोडला जातो.समाजावर योग्य संस्कार होतात. भक्त संप्रदायामध्ये जातीपातीच्या पलीकडे जाऊन संत समाज समृद्ध समाजाची सामाजिक समरसता निर्माण करण्याचे काम करतो.समाजातील वाईट गोष्टींवर कीर्तनकार प्रहार करतो. 'नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी' याप्रमाणे कीर्तनकार समाजाला योग्य दिशा दाखवण्याचे काम करतो असे ते म्हणाले. सरपंच वैजनाथ तांदळे म्हणाले की गाव पातळीवर काम करत असताना सामुदायिक प्रयत्न महत्त्वाचे असतात. संतांनी पर्यावरणाचे महत्त्व सांगितले आहे. अध्यक्षीय समारोपात डॉ.पि.के कुलकर्णी म्हणाले की पंच परिवर्तनाच्या माध्यमातून समाजाची

प्रचंड क्रयशक्ती असलेल्या युवावर्गाची व्यसनधिनातेमुळे अपरिमित हानी : डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई : व्यसनाधीनता हा समाजाला लागलेला शाप असून व्यसनाधीनतेमुळे केवळ व्यसनी व्यक्तीचेच नाही तर त्याच्यासोबत त्याच्या कुटुंबीयांची समाजाची आणि राष्ट्राचे अपरिमित नुकसान होते असे वक्तव्य सुप्रसिद्ध मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले. नशामुक्त महाराष्ट्र अभियाना अंतर्गत पोलीस प्रशासन बीड च्या वतीने आयोजित नशामुक्त समाज या अंमली पदार्थ विरोधी जनजागर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

एमआयटी इंग्लिश स्कूल नागझरी परिसर या भागात झालेल्या या व्यसनमुक्ती जनजागर कार्यक्रमात विचारमंचावर अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, पोलीस उपाधीक्षक ऋषिकेश शिंदे व अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी बाल वयातील संस्कार हे महत्वाचे असतात. यां वयात मुलं निरीक्षनाने आकलन करत असतात आणी त्यांची बुद्धी परिपक्वतेपेक्षा भावनिकतेवर काम करत असते. या वयात मुलांना योग्य मार्गदर्शन आणी संस्कार मिळाल्यास त्यांना आपोआप चांगली नैतिक मूल्य आत्मसात करता येतात. नैतिक संस्काराशिवाय नैतिक अधिष्ठान असलेला नैतिक समाज निर्माण होऊ शकत नाही आणि जोपर्यंत नैतिक समाज निर्माण होत नाही तोपर्यंत ते राष्ट्र महासत्ता बनवू शकत नाही आणि त्यामुळे सर्व महापुरुषांनी समाज हा व्यसनमुक्त असावा आणि विज्ञानवादी असावा या विचारांचा आग्रह धरला होता. सर्व प्रकारची व्यसनी हे निश्चितपणे सुटू शकतात त्यासाठी व्यसनाधीन माणसाची स्वतःची प्रबळ इच्छाशक्ती व सुरुवातीच्या काळात योग्य माणूस उपचार तज्ज्ञाचे व समोपदेशकाचे औषधोपचार व समुपदेशन आवश्यक असते असेही डॉ.इंगोले यांनी यावेळी सांगितले. सर्वप्रथम समाजात व्यसनमुक्ती व्हावी म्हणून जनप्रबोधन कार्यक्रम ठेवल्याबद्दल समाजातील जबाबदार नागरिक व्यसनमुक्ती तज्ज्ञ म्हणून बीड पोलीस प्रशासनाचे कौतुक करीत त्यांनी असेच समाज उपयोगी कार्यक्रम येणाऱ्या काळात ठेवावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी बोलताना उप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी व्यापक जनजागृती आणि अमली पदार्थांच्या विरोधात कठोर कारवाई हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. टप्प्याटप्प्याने यात शासनाच्या सर्वच विभागांचा सहभाग घेतला जाणार आहे. हे व्यसनमुक्ती जनप्रबोधन धोरण यशस्वी व्हावे यासाठी ग्राम पातळीपासून ते जिल्हा, विभाग आणि मंत्रालयीन स्तरापर्यंत जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे अशी माहिती सांगितली. पोलीस उपाधीक्षक ऋषिकेश शिंदे यांनी व्यसनमुक्ती ही काळाची गरज आहे. व्यसनाधीनतेमुळे अनेक संसार देशोधडीला लागल्याचे सांगितले.

नशामुक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी विविध विभागांच्या सहकार्याने अशाप्रकारे सर्वसमावेशक अभियान राबविणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. पालकांनी आपल्या मुलांवर काळजीपूर्वक लक्ष द्यावे, त्यांचे मित्र, वर्तन याकडे विशेषत्वाने ध्यान देणे गरजेचे असल्याचे सांगितले. यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी केंद्र शासनाने विविध केंद्रीय व राज्य शासनाच्या विभागांमध्ये समन्वय साधून सन २०२९ पर्यंत संपूर्ण देशातून अमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यां उद्दिष्टाच्या अनुषंगाने शाळेमधील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षकांमध्ये आणि पालकांमध्ये व्यसनाधीनतेविषयी जागरूकता वाढवावी हा हेतू ठेवून हा कार्यक्रम ठेवण्यात आल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एमआयटी इंग्लिश स्कूलचे विश्वस्त, मुख्याध्यापक, शिक्षक आणि कर्मचारीवृंद यांनी परिश्रम घेतले.

नवीन क्रेडिट फ्रेमवर्क विकसित करण्याचे आवाहन

मुंबई : अदाणी समूहाचे अध्यक्ष श्री. गौतम अदाणी यांनी भारतातील आघाडीच्या क्रेडिट रेटिंग संस्थांपैकी एक असलेल्या केअरएज ग्रुप ला जगातील पहिले सर्वसमावेशक इंटिग्रेटेड प्लॅटफॉर्म इन्फ्रास्ट्रक्चर साठी क्रेडिट फ्रेमवर्क विकसित करण्याचे आवाहन केले. असे फ्रेमवर्क भारतातूनच का विकसित होऊ नये आणि या प्रयत्नाचे नेतृत्व भारतानेच का करू नये, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.श्री. अदाणी म्हणाले की, केअरएज ग्रुप सोबतचा त्यांचा संबंध जवळपास दोन दशकांचा आहे. आता हा संबंध 100 हून अधिक संस्थांमधील ₹3 लाख कोटींपेक्षा अधिक रेट केलेल्या मालमत्तांपर्यंत विस्तारला आहे.

किया इंडियाने सर्वोत्तम होलसेल विक्रीची नोंद केली

नवी दिल्ली: किया इंडिया या देशातील अग्रगण्य मास-प्रीमियम ऑटोमेकर कंपनीने आज ऑगस्ट २०२६ मधील आपल्या होलसेल विक्रीचे आकडे जाहीर केले आहेत, गेल्या वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत ४८.१ टक्क्यांची वाढ नोंदवली आहे. कंपनीने ऑगस्ट २०२५ मधील १९,६०८ युनिट्सच्या तुलनेत ऑगस्ट २०२६ मध्ये २९,०४२ युनिट्सची विक्री केली आहे, ज्यामधून विविध बॉडी स्टाईल्स आणि पॉवरट्रेनमधील वाहनांच्या विस्तृत श्रेणीला ग्राहकांकडून मिळणारी सतत पसंती दिसून येते. किया इंडियाच्या स्थापनेपासून ऑगस्ट महिन्यातील ही आजवरची सर्वोत्तम होलसेल विक्री ठरली आहे.हा वेग वर्षभर कायम राहिला असून किया इंडियाची २०२६ वर्षाच्या आतापर्यंतची (वायटीडी) होलसेल विक्री २२०,९९१ युनिट्सवर पोहोचली आहे, जी २०२५ मधील याच कालावधीतील १८३,८८२ युनिट्सवरून २०.१ टक्क्यांपेक्षा जास्त वाढली आहे. कंपनीच्या या सातत्यपूर्ण कामगिरीचे श्रेय पहिल्यांदाच एसयूव्ही खरेदी करणाऱ्यांपासून ते प्रीमियम, वैशिष्ट्यपूर्ण आणि इलेक्ट्रिफाइड पर्यायांचा शोध घेणाऱ्या भारतातील ग्राहकांच्या बदलत्या मोबिलिटी गरजा समजून घेण्यावर आणि त्यांना प्रतिसाद देण्यावर लक्ष केंद्रित करण्याला जाते.

जपानी पॉप संस्कृतीला दिले नवे व्यासपीठ

मुंबई: टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने ॲनिमेशन एक्सप्रेस यांच्या भागीदारीत 28 ते 30 ऑगस्ट दरम्यान मुंबईतील नेस्को एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित करण्यात आलेल्या ॲनिमे इंडिया 2026 च्या मुंबई आवृत्तीचा यशस्वी समारोप केला. तीन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात 45,000 हून अधिक ॲनिमेप्रेमी, गेमर्स, कॉस्प्लेयर्स, कंटेंट क्रिएटर्स आणि पॉप-संस्कृतीचे चाहते सहभागी झाले. या माध्यमातून टीकेएम ला जनरेशन झेड आणि युवा मिलेनियल्सशी सांस्कृतिकदृष्ट्या सुसंगत अनुभवांद्वारे संवाद साधण्याचे तसेच ब्रँडशी त्यांची आत्मीयता अधिक दृढ करण्याचे एक अनोखे व्यासपीठ मिळाले.

'अडकित्ता' या मराठी झी5च्या नव्या चित्रपटाचा प्रीमियर 11 सप्टेंबर 2026 रोजी

छत्रपती संभाजीनगर : खऱ्या भावना आणि सर्वसामान्यांच्या आयुष्यातील अनुभव मांडणाऱ्या कथा प्रेक्षकांसमोर आणण्याची आपली वचनबद्धता कायम ठेवत मराठी झी5वर 'अडकित्ता'चा प्रीमियर 11 सप्टेंबर 2026 रोजी होणार आहे. नातेसंबंध, कुटुंबातील नात्यांची गुंतागुंत आणि आजच्या समाजातील वास्तवाचा वेध घेणाऱ्या प्रभावी मराठी ओरिजिनल्समध्ये 'अडकित्ता'ची भर पडणार आहे. पालकत्व, विश्वास आणि जिव्हाळ्याच्या नात्यातील गुंतागुंत मांडणारी उत्कंठावर्धक आणि भावनिक कथा या चित्रपटातून प्रेक्षकांसमोर आणण्यात येणार आहे.आशुतोष परांडकर दिग्दर्शित आणि मंगेश पवार अँड कंपनी व जॅकपॉट एंटरटेनमेंट निर्मित 'अडकित्ता' हा कुटुंबातील नातेसंबंध, काम आणि वैयक्तिक आयुष्यातील समतोल तसेच दुसऱ्याची काळजी घेण्याची जबाबदारी यांमधील भावनिक गुंतागुंतीचा वेध घेणारा कौटुंबिक चित्रपट आहे.

प्रोस्टेट कॅन्सरविषयी वेळीच तपासणी आणि उपचार अत्यावश्यक

छत्रपती संभाजीनगर : पुरुषांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगांमध्ये प्रोस्टेट कॅन्सरचे प्रमाण वाढत असून, या आजाराचे वेळीच निदान झाल्यास प्रभावी उपचार करणे शक्य आहे. त्यामुळे पुरुषांनी प्रोस्टेट कॅन्सरची लक्षणे, जोखमीचे घटक आणि नियमित तपासणी याबाबत जागरूक राहणे गरजेचे आहे, असे मत मेडिकव्हर हॉस्पिटलचे युरोलॉजिस्ट डॉ. मयूर दळवी आणि कर्करोग तज्ञ डॉ. अनुप तोष्णीवाल यांनी व्यक्त केले.डॉ. मयूर दळवी यांनी सांगितले की, "प्रोस्टेट कॅन्सरच्या सुरुवातीच्या टप्प्यात अनेक रुग्णांमध्ये ठळक लक्षणे दिसत नाहीत. त्यामुळे जोखीम असलेल्या पुरुषांनी डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य वेळी तपासणी करणे महत्त्वाचे आहे. लवकर निदान झाल्यास उपचारांचे पर्याय अधिक प्रभावी आणि परिणामकारक ठरू शकतात."

डॉ. अनुप तोष्णीवाल यांनी सांगितले की, "प्रोस्टेट कॅन्सरबाबत पुरुषांमध्ये अजूनही संकोच आणि गैरसमज आढळतात. लघवीशी संबंधित कोणतीही समस्या दीर्घकाळ दुर्लक्षित न करता तज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. जनजागृती, नियमित तपासणी आणि वेळेवर उपचार हे प्रोस्टेट कॅन्सरविरुद्धच्या लढ्यात महत्त्वाचे घटक आहेत."

आयुष्यभर लक्षात राहणारे धडे

शिक्षकांचा प्रभाव वर्गखोल्यांच्या पलीकडेही पोहोचतो आणि आपलं विचार करणं, काम करणं आणि आयुष्य जगणं याला दिशा देतो. स्वतःवर विश्वास ठेवायला शिकवणं, शिस्त, चिकाटी आणि दयाळूपणाचं महत्त्व सांगणं असे धडे शाळा आणि कॉलेज संपल्यानंतरही कायम आपल्यासोबत राहतात. या शिक्षक दिनानिमित्त सोनी सबचे कलाकार जितेन लालवानी, विवाना सिंग, इक्बाल खान, गुलकी जोशी, मुस्कान बामने आणि दीक्षा जोशी यांनी त्यांच्या प्रवासावर प्रभाव टाकणाऱ्या शिक्षक आणि मार्गदर्शकांची आठवण करून दिली आणि ते जीवनधडे शेअर केले जे आजही त्यांच्यासोबत आहेत.

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीवर पंचायत समितीच्या सदस्यांचा संताप

वन्यप्राण्यांच्या नुकसानीवर वनविभागाला धारेवर; मका बियाण्यांवर कृषी विभागाला कारवाईचे निर्देश

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.०३ सप्टेंबर - शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या विभागांच्या कामकाजावर पंचायत समितीच्या बैठकीत सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. उपसभापती माया ललित सुरासे यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समितीच्या सभागृहात दि.०३ रोजी झालेल्या बैठकीत वन्यप्राण्यांकडून पिकांचे होणारे नुकसान, मका बियाण्यांची उगवण न होणे आणि विविध विभागांच्या अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

"आजच्या बैठकीला अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहता आले नाही. वरिष्ठ कार्यालयाने छत्रपती संभाजीनगर येथे बोलावल्याने मला तेथे जावे लागले. त्यामुळे बैठकीसाठी विभागाचा प्रतिनिधी पाठवण्यात आला होता. एकूण सहा मुद्दे असून, त्यापैकी दोन मुद्द्यांचे निराकरण करण्यात आले आहे. उर्वरित चार मुद्द्यांचेही निराकरण करण्यात येईल."
- शिवाजी टोंपे
वनक्षेत्रपाल प्रादेशिक वनविभाग

"आज सकाळी साडे नऊ वाजता कुटुंबातील एका व्यक्तीच्या निधनाचा दुःखद प्रसंग घडल्याने त्या ठिकाणी जाणे आवश्यक होते. त्यामुळे पंचायत समितीच्या बैठकीला उपस्थित राहता आले नाही. ही अनुपस्थिती अपरिहार्य कारणामुळे झाली असून, बैठकीकडे दुर्लक्ष करण्याचा कोणताही हेतू नव्हता."
विजय काळवणे
आगारप्रमुख कन्नड आगार

तालुक्यात वन्यप्राण्यांकडून शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचा मुद्दा बैठकीत उपस्थित करण्यात आला. नुकसान रोखण्यासाठी प्रादेशिक वनविभागाकडून अपेक्षित उपाययोजना होत नसल्याची नाराजी सदस्यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या नुकसानीची गांभीर्याने दखल घेऊन वनविभागाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली. याबाबत ठरावही घेण्यात आला.

प्रादेशिक वनविभागाचे वनक्षेत्रपाल शिवाजी टोंपे यापूर्वी झालेल्या चार बैठकींना अनुपस्थित राहिल्याचा मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला. ३ सप्टेंबरच्या बैठकीलाही ते उपस्थित नसल्याने त्यांच्या विभागाचा प्रतिनिधी पाठवण्यात आला होता. याबाबत सदस्यांनी नाराजी व्यक्त केली.

तालुक्यात मका पिकांच्या बियाण्यांची उगवण होत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचा मुद्दाही बैठकीत गाजला. संबंधित बियाण्यांची तपासणी करून शेतकऱ्यांच्या तक्रारींची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली. याप्रकरणी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने तत्काळ कारवाई करावी, असा ठराव घेण्यात आला.

दरम्यान, पंचायत समितीच्या बैठकीला सर्व संबंधित विभागप्रमुखांनी उपस्थित राहणे अपेक्षित असताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पूर्व व पश्चिम विभागाचे कर्मचारी अनुपस्थित होते. याबाबत सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. पुढील बैठकीत संबंधितांना नोटीस बजावण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

एसटी महामंडळाचे अधिकारी व कर्मचारीही बैठकीला अनुपस्थित होते. मात्र, आगारप्रमुख विजय काळवणे यांच्या अनुपस्थितीमागे कौटुंबिक दुःखद प्रसंग असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

बैठकीत लक्ष्मी राठोड, कमल मोरे, अनुराधा जैस्वाल, सविता जंगले, कैकशा पठाण, मुक्तार शहा, मीना पाडसवान, सिद्धेश्वर झालटे, संतोष करवंदे, मंदा बोलधने, कचरू सावंत आणि शरद जाधव यांनी विविध प्रश्नांवर चर्चा केली. शेतकरी, रस्ते, वन्यप्राणी तसेच संबंधित विभागांच्या कामकाजाबाबत सदस्यांनी प्रश्न उपस्थित करून प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

बैठकीत उपस्थित केलेल्या प्रश्नांवर संबंधित विभागांनी वेळेत कार्यवाही करून त्याचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

छायाचित्रणाच्या छंदाला व्यवसायाचे रूप; कांचनवाडीत 'फोटो पार्क क्रिएटिव्ह स्टुडिओ'चे उद्घाटन

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : कांचनवाडी येथे 'फोटो पार्क क्रिएटिव्ह स्टुडिओ'चे उद्घाटन ज्येष्ठ छायाचित्रकार व पक्षीतज्ज्ञ डॉ. दिलीप यार्दी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी रोहन डंके यांनी डॉ. यार्दी यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना स्वरदा डंके यांनी स्टुडिओच्या वैशिष्ट्यांची माहिती दिली. छत्रपती संभाजीनगरमध्ये महिलेकडून सुरू करण्यात आलेला इनडोअर व आउटडोअर फोटोग्राफीचा हा पहिला स्टुडिओ असल्याचे त्यांनी सांगितले. विविध सण-उत्सवांच्या अनुषंगाने विशेष छायाचित्रणासह कुटुंबाचे छायाचित्रण, मातृत्व छायाचित्रण संच तसेच नवजात बालकांचे छायाचित्रण या सेवा स्टुडिओत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. दिलीप यार्दी यांनी स्वरदा डंके यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. बीएस्सी व एमएस्सीमध्ये सुवर्णपदक मिळविल्यानंतर नोकरीच्या मागे न धावता आपल्या छायाचित्रणाच्या छंदाचे व्यवसायात रूपांतर करण्याचे धाडसी पाऊल त्यांनी उचलले आहे. त्यांच्या या उपक्रमातून इतर मुलींनीही प्रेरणा घ्यावी, असे आवाहन डॉ. यार्दी यांनी केले.

उद्घाटनानंतर महापौर समीर राजूरकर तसेच नगरसेवक सुमित त्रिवेदी यांनी स्टुडिओला भेट देऊन स्वरदा डंके यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतीश जोशी, महेश डंके, संगीता जोशी व संध्या डंके यांनी परिश्रम घेतले. यावेळी शहरातील अनेक छायाचित्रकार, मान्यवर तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याहस्ते किशोर तावरे यांचा राष्ट्रवादी काँग्रेसात प्रवेश

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०३ :- मुंबई राष्ट्रवादी भवन येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीयध्यक्षा श्रीमती.सुनेत्राताई अजितदादा पवार,प्रदेशध्यक्ष खा.श्री.सुनील तटकरे यांच्या हस्ते व आमदार तथा जिल्हाध्यक्ष श्री.सतिशभाऊ पा.चव्हाण,राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे प्रदेशध्यक्ष श्री.निखिल ठाकरे,राष्ट्रवादी युवती प्रदेशध्यक्षा सौ.निर्मला नवले,यांच्या प्रमुख उपस्थितीत पैठण येथील युवा नेतृत्व किशोर तावरे राष्ट्रवादी काँगेस पक्षात प्रवेश केला. यावेळी किशोर तावरे यांचा पक्षात योग्य सन्मान केला जाईल. पैठण शहराच्या,तालुक्याच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी दिली.

या प्रसंगी प्रदेश सरचिटणीस श्री.दिलीप पा.बनकर, जिल्हा उपाध्यक्ष श्री.ज्ञानेश्वर पा.कापसे,पैठण विधानसभा अध्यक्ष. विनोद पा.तांबे,तालुका अध्यक्ष,विलास भैय्या शेळके, सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष.अनिल पा.हजारे, यांच्या सह एकनाथ जाधव,किशोर लाड,ऋषिकेश चौधरी,वैभव शिरवत,शिवप्रसाद कोल्हे,कृष्णा तावरे,शंकर जाधव,कृष्णा शिंदे,शाम तावरे,अभिजीत निंबाळकर,कुणाल तांगडे,नंदू बाबर,मनोज ढवळे,विजय काकडे,यांच्या सह संख्येने मोठया संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. युवा नेतृत्व किशोर तावरे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात झालेल्या या प्रवेशाने तालुक्यात जल्लोषाचे वातावरण असून शिवसेनेत मात्र पोकळी निर्माण झाली आहे.

विभागीय लोकशाही दिन मंगळवारी 15 सप्टेंबर रोजी आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.३, (विमाका): प्रत्येक महिन्यातील दुसऱ्या सोमवारी नियमितपणे विभागीय लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. परंतू या महिन्यातील दुसऱ्या सोमवारी (१४) रोजी गणेश चतुर्थी निमित्त सुट्टी असल्याने त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस मंगळवारी, १५ सप्टेंबर २०२६ रोजी विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. विभागीय आयुक्त कार्यालयात सकाळी ११.०० वाजता होणाऱ्या या लोकशाही दिनात जिल्हास्तरावर न सुटलेल्या तसेच तक्रारदारांचे समाधान न झालेल्या प्रश्नांवर सुनावणी करण्यात येणार आहे.

तक्रार करण्यासाठीचे अर्ज विहित मुदतीत नमुना प्रप्रत्र-१ (क) मध्ये दोन प्रतीत आवश्यक त्या कागदपत्रासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे आवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार) यांच्याकडे स्वीकारण्यात येणार आहेत.

अर्जाच्या दोन प्रती विभागीय लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्त यांच्याकडे समक्ष पुन्हा सादर कराव्यात. तसेच ज्यांनी यापुर्वीच्या विभागीय स्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेले असतील परंतू त्यांचे प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही, अशा प्रकरणात त्यांना पुन्हा अर्ज देता येणार नाही.

जिल्हास्तरावरील लोकशाही दिन कार्यक्रमात ज्या प्रश्नांची सोडवणूक होवू शकली नाही किंवा या प्रश्नाबाबत जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये तक्रारदाराचे समाधान झाले नाही, असे सर्व प्रश्न विभागीय स्तरावरील लोकशाही दिनामध्ये घेण्यात येणार आहेत, असे विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रसिध्दी

बालचित्रकारांच्या कुंचल्यातून उमटला रस्ते सुरक्षेचा संदेश

पिशोर पोलिसांतर्फे वाहतूक जनजागृती चित्रकला स्पर्धा; 300 विद्यार्थ्यांचा सहभाग

कन्नड :दि.०२ सप्टेंबर - रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासोबतच विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियम व रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी पिशोर पोलिस ठाण्याच्या पुढाकाराने दि.०१ रोजी

विविध शाळांमध्ये वाहतूक जनजागृती चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत इयत्ता पाचवी ते दहावीच्या सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वाहतूक शाखेच्या समन्वयाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. 'वाहतूक नियम पाळूया, अपघात टाळूया' तसेच 'हेल्मेट आणि सीट बेल्ट हे जीवनाचे सुरक्षा कवच' हे स्पर्धेचे विषय होते. विद्यार्थ्यांनी आपल्या



कल्पकतेतून वाहतूक नियमांचे पालन, हेल्मेट व सीट बेल्टचे महत्त्व आणि रस्ते सुरक्षेचे संदेश चित्रांमधून प्रभावीपणे मांडले.

महात्मा ज्योतिबा फुले हायस्कूल, समता माध्यमिक विद्यालय, मथुरामाता माध्यमिक विद्यालय, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चिंचोली लिंबाजी आणि जिल्हा परिषद माध्यमिक शाळा नाचनवेल येथील विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. वाहतुकीचे नियम हे केवळ दंडापासून वाचण्यासाठी नसून स्वतःसह इतरांचा जीव सुरक्षित ठेवण्यासाठी आहेत. ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये बालपणापासून निर्माण व्हावी, या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

स्पर्धेनंतर प्रत्येक शाळेतील उत्कृष्ट चित्रांची निवड करण्यात आली असून त्यापैकी २३ चित्रे पुढील टप्प्यासाठी पाठविण्यात येणार आहेत.

ग्रामीण रुग्णालय सोयगाव येथे वैद्यकीय अधिक्षक डॉ.दिनाजी खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३ सप्टेंबर

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कमलाकर मुदखेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा दि.२५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर निमीत्त जिल्हा नेत्रशल्यचिकित्सक डॉ.अर्चना भडीकर यांच्या मार्गदर्शनानुसार दि.१ मंगळवार रोजी नेत्रदान पंधरवडया निमित्त ग्रामीण रुग्णालय सोयगाव येथे वैदयकीय अधिक्षक डॉ.दिनाजी खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकीय अधिकारी डॉ.अजीत पाटिल यांच्या मार्गदर्शक उपस्थितीत नेत्रदान पंधरवाडा साजरा करण्यात आला. याप्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ.अजित पाटिल यांनी नेत्रदानाविषयी माहिती देत नेत्रदानासाठी आवाहन करत त्यांच्या हस्ते नागरिकांना नेत्रदानसंमतीपत्राचे वाटप केले. यावेळी नेत्रचिकित्सा अधिकारी सुहासिनी जावळे यांनी उपस्थीत रुग्ण व नातेवाइकांचे नेत्रदानासंबंधी समज गैरसमज,नेत्रदानाची प्रक्रिया व त्यासंबंधित शंकाचे निरसन करत नेत्रदानसंमतीपत्र भरण्यासाठी आवाहन करत उपस्थितांकडून नेत्रदान संमतीपत्र भरुन घेत नेत्ररुग्णांची तपासणी केली,तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ.चव्हाण व सुनिल वानखेडे यांनीही उपस्थितांना आवाहन करत नेत्रदानसंमतीपत्राचे वाटप केले यावेळी कारके,ज्योती आचरे,पंकज मंडवे,भुषण चव्हाण,गणेश बोटकर,ज्योती भवर व रुग्णांलयातील इतर कर्मचारी यांनी विशेष सहकार्य करत कार्यक्रम यशस्वी केला.

एमजीएमचे प्रा.डॉ.अमरदीप असोलकर यांना मिळाले यूके डिझाईन पेटंट

छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय विद्याशाखेच्या शिक्षणशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ.अमरदीप असोलकर यांना 'फोल्डेबल मल्टी-सेन्सरी इंटरॲक्टिव्ह लर्निंग असिस्टिव्ह डिव्हाईस सिस्टीम' या नाविन्यपूर्ण उपकरणाच्या डिझाईनसाठी इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी ऑफिस, यूके कडून यूके डिझाईन पेटंट मिळाले आहे.

ध्वजारोहणाने इंद्रध्वज विधानास मंगलमय प्रारंभ; आचार्य हेमसागरजी महाराज यांच्या मंगल सान्निध्यात आर्यनंदी कॉलनीत धार्मिक सोहळा

तभा वृत्तसेवा

छत्रपतीसंभाजीनगर: आर्यनंदी कॉलनी येथे सिद्धांत चक्रवर्ती आचार्य श्री १०८ हेमसागरजी महाराज यांच्या मंगल सान्निध्यात इंद्रध्वज विधानास बुधवारी (दि. २) भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. कांतीदेवी, मनीष, श्रद्धा, मोहनकुमारजी, सुनिता, पदम, पायल, मानसी, आशीका, सोनी-परीवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. २ ते ९ सप्टेंबरदरम्यान हा धार्मिक सोहळा होणार आहे.

सकाळी गुरु आज्ञा, आचार्य निमंत्रण, ध्वजारोहणानंतर भगवान जिनेंद्रांच्या अभिषेक व शांतिधारेस प्रारंभ झाला. त्यानंतर मंगल कलश, अखंड दीप प्रज्वलन, मंडप प्रतिष्ठा, अंकुरारोपण व जाप अनुष्ठान आदी विधी पार पडले. विधीनंतर आचार्य श्री हेमसागरजी महाराज यांनी भाविकांना मंगल आशीर्वचन दिले.

इंद्रध्वज विधानात विशाल पंचमेरू, ४५८ जिनालये, ४५८ जिनेंद्र प्रतिमा व मंदिरांच्या ध्वजांचा समावेश आहे. यासाठी धार्मिक साहित्य अयोध्येतून आणण्यात आले आहे.

आचार्य श्रींनी सांगितले की, इंद्रध्वज हा सद्गुणांच्या विजयाचे प्रतीक आहे. क्रोध, मान, माया व लोभावर विजय मिळवून क्षमा, विनय, सरलता आणि त्यागाचा स्वीकार करावा. आत्मचिंतन व संयमातूनच खरे समाधान मिळते, असे त्यांनी सांगितले.

शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र राठोड यांचे निधन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३ सप्टेंबर : छत्रपती संभाजीनगर जिल्हाचे शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र पेलाद राठोड (वय.६०) यांचे अल्पशा आजाराने बुधवार (दि.२) सकाळी १०.३० मिनिटांनी अपोल हॉस्पिटल मुंबई येथे उपचारा दरम्यान प्राणज्योत मालवली.त्यांच्यावर गुरुवार (दि.३)सकाळी ११ वाजता सोयगाव तालुक्यातील हनुमंतखेडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

सोयगांव तालुक्यातील हनुमंतखेडा ह्या छोट्याश्या गावात, बंजारा समाजातील गरीब कुटुंबात जन्मलेले राजेंद्र राठोड यांचे निर्भिड नेतृत्व,संघटन कौशल्याने ऐन तरुण पणात तालुक्याच्या राजकारणात आपला ठसा उमटविला. बाळासाहेबांच्या ज्वलंत हिदुत्वाने प्रेरीत होऊन त्यानी एका शिवसैनिकांपासुन सुरू केलेला प्रवास ग्रामपंचायत सदस्य, सरपंच,तालुका प्रमुख,जिल्हाप्रमुख,दोन वेळा जिल्हा परिषद सदस्य,जिल्हा परिषद सभापती पद भुषवित जिल्ह्यातील राजकारणात त्यांनी आपला दबदबा निर्माण केला होता जिल्हा बँकेची निवडणूक संपली त्यादिवशी त्यांची तब्बेत बिघडल्यावर त्यांना मुंबई येथील अपोलो हॉस्पिटलमध्ये दाखल करून उपचार सुरु होते परंतु त्यांनी दुर्मिळ अशा हृदयाचा आजार झाल्याने बुधवारी सकाळी दहा वाजुन ३० मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात आई,पत्नी,दोन मुली,एक मुलगा,सुन,दोन भाऊ,तीन बहिणी असा परिवार आहे.

अभिनेता रजत बेदींची मराठी सिनेसृष्टीत एन्ट्री 'बंधू' चित्रपटाचे प्रस्तुतकर्ते

तभा वृत्तसेवा

मुंबई : हिंदी आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाची छाप उमटविणारे अभिनेता रजत बेदी आता मराठी सिनेसृष्टीत प्रवेश करीत आहेत. आगामी 'बंधू' या मराठी चित्रपटाचे ते प्रस्तुतकर्ते असून, त्यांच्या सहभागामुळे बेदी कुटुंबाचा मराठी चित्रपटसृष्टीशी नवा ऋणानुबंध जुळला आहे.

प्रसिद्ध दिग्दर्शक-निर्माते नरेंद्र बेदी यांचे पुत्र आणि ज्येष्ठ उर्दू साहित्यिक, पटकथाकार व दिग्दर्शक राजिंदर सिंह बेदी यांचे नातू असलेल्या रजत बेदी यांना चित्रपटसृष्टीचा समृद्ध वारसा लाभला आहे. 'कोई मिल गया', 'जोडी नंबर १', 'द हिरो', 'रक्त', 'अक्सर' आणि 'पार्टनर' यांसह अनेक हिंदी चित्रपटांत त्यांनी भूमिका साकारल्या आहेत. तसेच तमिळ, तेलुगू, कन्नड आणि पंजाबी चित्रपटांतही त्यांनी काम केले आहे.

जेएसडी स्टुडिओ आणि ट्राईफ्लिक्स एंटरटेनमेंटच्या सहकार्याने 'बंधू'ची निर्मिती होत असून, नितीन सिंधूविजय सुपेकर यांनी लेखन-दिग्दर्शन केले आहे. चित्रपट २० नोव्हेंबरला प्रदर्शित होणार आहे.

अवैध वाळू वाहतुक : राहाता डंपरसह 15 लाख 20 हजारांचा मुद्देमाल जप्त; एकाला अटक, दुसरा फरार

राहाता (वार्ताहर) : पोलीस ठाण्याच्या हद्दीत विनापरवाना अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरवर पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईत एका संशयितास ताब्यात घेऊन दोन ब्रास वाळूसह सुमारे १५ लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी एक आरोपी फरार असून, त्याचा शोध सुरू आहे.

अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर विभागाचे सोमनाथ वाघचौरे यांनी अवैध धंद्यांविरोधात कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार राहाता पोलीस ठाण्याचे पथक हद्दीत रात्री गस्त घालत असताना पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली. पुणतांबा गावाच्या शिवारात एका इसमाकडून विनापरवाना वाळूची वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.

पुणतांबा गावात पोलिसांनी संशयित डंपरचा पाठलाग करून तो अडविला. डंपर चालकास वाळू वाहतुकीचा परवाना आहे का, याबाबत विचारणा केली असता त्याच्याकडे कोणताही वैध परवाना नसल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी डंपर ताब्यात घेऊन चालकाची चौकशी केली असता त्याने आपले नाव सुनील भिका पवार (वय ४६, रा. पिंपळवाडी, ता. राहाता) असे सांगितले.

डंपरमध्ये वाळू भरलेली असून, ती वाहून नेण्यासाठी कोणताही वैध परवाना नसल्याचे पोलिसांच्या तपासात आढळले. पोलिसांनी वाहन व वाळू असा एकूण १५

लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणातील दुसरा संशयित विकास गोंदकर, रा. शिर्डी हा फरार असून, त्याचा शोध घेण्यात येत आहे.

या प्रकरणी राहाता पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३५८/२०२६ अन्वये संबंधित कायद्यातील कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास राहाता पोलीस करीत आहेत.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, पोलीस निरीक्षक दिपक सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस पथक तसेच राहाता पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी केली.

अवैध वाळू वाहतुकीविरोधातील कारवाईमुळे वाळू तस्करांचे धाबे दणाणले असून, महसूल व पोलिस प्रशासनाने अशा कारवाया आणखी तीव्र करण्याची गरज आहे.

जाहिर प्रकटन

मा.विदयमान प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब सोयगांव यांचे न्यायालयात

फौजदारी किरकोळ अर्ज क्रं. ५७/२०२६. नि. क्रं.

1) यासीफ नुरशरीफ शेख, वय १८ वर्षे, धंदा शिक्षण, रा. तिडका, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर,

विरुद्ध.

ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय तिडका, ता. सोयगांव, जि. छ.संभाजीनगर,

प्रकरण :- कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९, अन्वये

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी मा. न्यायालयात कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९, अन्वये जन्म नोंद आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार नामे यासीम नुरशरीफ शेख याचा जन्म दिनांक २०/०६/२००८ रोजी मौजे तिडका, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे झालेला असून अज्ञानामुळे जन्माची नोंद तत्कालीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालय तिडका येथे झालेली नाही. त्यामुळे जन्म नोंद आदेश होण्याबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या अर्जास उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जावर योग्य ते आदेश पारीत केल्या जाईल याची नोंद असु दयावी.

आजरोजी दिनांक ०२/०९/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १४/१०/२०२६.

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

जाहीर प्रगटन / सायटेशन नोटीस

मा. श्री. एन. एल. हेमणे, 2 रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर

सिव्हील एम.ए. क्र. 615/2026

प्रकरणात पुढील तारीख 16/10/2026

अर्जदार -1) बीसमिला भ्र. इब्राहीम शेख वय 80 वर्षे, धंदा घरकाम रा. कलंदर कॉलोनी, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद 2) शेख हबीब शेख इब्राहीम वय 55 वर्षे, धंदा मजूरी रा. घर नं. 382, गल्ली नं. 2 मदनी नगर, मालेगांव ता. मालेगांव, जि. नाशिक 3) युसूफ इब्राहीम शेख वय 53 वर्षे, धंदा मजूरी रा. कलंदर कॉलनी, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद 4) अनीसा भ्र. अब्दुर रशीद वय 41 वर्षे, धंदा घरकाम रा. घर नं. 95, गल्ली नं. 5, सर्व्हे नं. 225, राजा नगर, मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक 5) नफीसा भ्र. सदाम तांबोळी वय 39 वर्षे, धंदा घरकाम रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात अॅड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारसप्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. 1 ते 5 हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे आहे. अर्जदार क्रं. 1 ही अर्जदार क्रं. 2 ते 5 यांची आई असून अर्जदार क्रं. 2 ते 5 हे आपसात सख्खे भाऊ व विवाहीत बहिणी आहे. अर्जदार क्रं. 1 चे पती व अर्जदार क्रं. 2 ते 5 यांचे वडील नामे इब्राहीम चंदुभाई शेख दिनांक 03/11/2024 रोजी मौजे कलंदर कॉलोनी, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. त्यामुळे मयत इन्ब्राहीम चंदुभाई शेख यांना अर्जदार क्रं. 1 ही पत्नी व अर्जदार क्रं. 2 व 3 मुले, अर्जदार क्रं. 4 व 5 मुली या नात्याने कायदेशीर वारसदार असून मयतास अर्जदार क्रं. 1 ते 5 यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत इब्राहीम चंदुभाई शेख यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून 30 दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक 03/09/2026 रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

जाहिर प्रगटन

मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. 186/2026.

अर्जदारः- १) लता शालीग्राम पाटील, वय 65 वर्ष, धंदा शेती, रा गोराडखेडा ता. पाचोरा जि. जळगांव 2) सुमनबाई राजाराम पाटील व 69 वर्षे धंदा शेती, रा. पुनगांव रोड, मल्हार नगर, पाचोरा ता पाचोरा जि. जळगाव 3) सरूबाई प्रल्हाद पाटील, वय 72 वर्षे, धंदा शेती. रा. गिरड ता. भडगांव जि. जळगांव 4) मंजुळाबाई अरुण पाटील, वय 63 वर्षे, चंदा शेती, रा करमाड बु ता. पारोळा जि. जळगांव 5) नर्मदाबाई धनराज पाटील, वय 75 वर्षे धंदा शेती, रा. निपाणे ता. एरडोल जि जळगाव 6) मगवान रामभाऊ पाटील (निकम) (मयत) 6.1) गणेश भगवान निकम (पाटील), वय 42 वर्षे, चंदाः शेती. रा. निंभोरा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). 6.2) सुषमा कैलास पाटील, वयः 48 वर्षे, धंदा शेती. रा. गांधी चौक, गिरड ता. भडगाव जि. जळगांव 6.3) वर्षा भारत पाटील, वयः 44 वर्षे, धंदा शेती, रा. हिंगोणे सिम ता. चाळीसगांव जि. जळगांव 6.4) चंद्रकला भगवान निकम (पाटील), वयः 65 वर्षे धंदाः शेती, रा. निंभोरा ता. सोयगांव जि औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

// विरुध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अॅड. आर. एस. महाजन साहेब, सोयगाव ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे. रामभाऊ महारू पाटील (निकम) हे दिनांक 13/02/1997 ला मौजे निंभोरा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे उपचार घेत असतांना मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहे अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः 09/10/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनाक 02/09/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव)

जाहिर प्रगटन

नोंदीचा प्रकार:खरेदी

माहिती मिळाल्याचा दि.०१/०९/२०२६ फेरफाराचा दि.०२/०९/२०२६लिहून देणार:भारत मारोती,राजेश्वर मारोती,रामराव मारोती,लक्ष्मण मारोती,विठ्ठल मारोती,शत्रुघ्न मारोती, रा.भोकर(खाता क्र.४८५)यांचे गट/सर्व्हे क्र.६०३ लागवडीयोग्य क्षेत्र ०.६६१८ हे.आर.चौ.मी.पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ०.००७९हे.आर.चौ.मी.पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी.हे त्यांनी गट क्र.६०३ मधील क्षेत्र ०.०१५८ मारोतराव महादजी पवार यांनी हयात असताना दस्त क्र.१९दि.१६/०१/१९८५रोजी लक्ष्मीबाई निवृत्तीराव ढगे अ.पा.क.निवृत्तीराव ग्यानोबाराव ढगे यांना हा प्लॉट विक्रि केला पूढे तोच प्लॉट लक्ष्मीबाई निवृत्तीराव ढगे अ.पा.क.निवृत्तीराव ग्यानोबाराव ढगे यांनी दस्त क्र.७२४ दि.१५/०५/१९९६ रोजी आत्माराम मारोतराव फूलारी,शिवाजी शेषराव सोळंके यांनी विक्रि केला पूढे तोच प्लॉट मधिल क्षेत्र ०.०१५८ पैकी क्षेत्र ०.००७९ आत्माराम मोरोतराव फूलारी यांनी दस्त क्र.२११दि.१२/०२/२००९रोजी गणेश रामकिशन कदम यांना विक्रि केला असून आज रोजी कै.मारोतराव महादजी पवार यांच्या वारसाच्या नावे सामाईक क्षेत्र आहे करिता म.ज.म.अ.१९६६चे कलम १४९व १५०अन्वये नोंद घेण्यात आली मंजूरीस्तव सादर समंती देणारे खातेदार:१)लक्ष्मीबाई निवृत्तीराव ढगे अ.पा.क.निवृत्तीराव ग्यानोबाराव ढगे (खाता क्र.०)दस्त क्र.१९दि.१६/०१/१९८५(२)आत्माराम मारोतराव फूलारी(खाता क्रमांकः०)दस्त क्र.७२४दि.१५/०५/१९९६लिहून घेणार:गणेश रामकिशन कदम(खाता क्र.१२४४५गट/सर्व्हे क्र.६०३लागवडीयोग्य क्षेत्र ०.००७९हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्रमांक २११दि.१२/०२/२००९प्रमाणे रक्कम रुपये २११००० घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणाऱ्यांचे नाव गाव नमूना नं.७/१२ वर दाखल केले. ज्या अर्थी उक्त फेरफारात तुमचा हितसंबंध आहे असे अधिकार अभिलेखावरुन /फेरफाराच्या नोंदवहीवरुन मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उक्त फेरफाराच्या नोंदी संबंधी तूम्हास सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोंदी संबंधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी अथवा लेखी पाठविण्यास फर्मावित आहे ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे,असे गृहित धरले जाईल.

ग्राम महसूल अधिकारी
तलाठी साझा भोकर.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

अग्रलेख

नोकरशाहीला 'सुप्रीम' चपराक

देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी आणि त्यांच्या मानसिक स्वास्थ्याशी थेट जुळलेल्या 'नीट' प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणाचे वादळ पूर्णपणे शांत झालेले नसताना, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अत्यंत महत्त्वाच्या निर्णयाने देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. नीट पेपरफुटीनंतर शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा व नीट परीक्षा विश्वासार्ह आणि पारदर्शी करण्याच्या मागणीसाठी जुलै महिन्यात विद्यार्थी आंदोलक रस्त्यावर उतरले होते. त्यांच्यावर दाखल केलेले सर्व 'एफआयआर' सर्वोच्च न्यायालयाने भारतीय संविधानाच्या कलम १४२ अंतर्गत मिळालेल्या विशेषाधिकारांचा वापर करून पूर्णपणे रद्दबातल ठरवले आहेत. संविधानातील कलम १४२ सर्वोच्च न्यायालयाला कोणत्याही खटल्यात किंवा प्रकरणात 'पूर्ण न्याय' (कम्प्लिट जस्टिस) देण्याचे विशेष आणि व्यापक अधिकार प्रदान करते. या कलमाचा वापर करण्याचा प्रसंग सर्वोच्च न्यायालयावर आला म्हणजे हा विषय गंभीरच असला पाहिजे, असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो.

आंदोलन संपविण्याच्या संदर्भात वाटाघाटी सुरू असताना विद्यार्थ्यांना दिलासा देण्याचा शब्द सरकारने दिला होता. आता जे सर्वोच्च न्यायालयाने केले, ते खरे तर सरकारनेच करायला हवे होते. मात्र, सरकारने दिलेल्या आश्वासनानंतर महिने उलटत चाललेले असताना प्रशासन आपल्या पठडीप्रमाणे कागदाला कागद जोडत राहिले. अखेर सर्वोच्च न्यायालयाने विशेषाधिकार वापरीत विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेतले व पुढील तपासालाही पूर्णविराम दिला. या आंदोलनामुळे खचून जाऊन आत्महत्या केलेल्या दुर्दैवी विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना तीन महिन्यांच्या आत आर्थिक भरपाई देण्याचे स्पष्ट आदेशही दिले. ही बाब निश्चितच दिलासादायक आहे. परंतु, येथे प्रश्न असा निर्माण होतो की, हे काम मुळात कुणाचे होते? सर्वोच्च न्यायालयाला संवैधानिक विशेषाधिकाराचा वापर करावा लागतो तेव्हा कुणी तरी जबाबदारीच्या पालनात चुकलेले असते. मग ते कोण? त्याचे उत्तर असे की, प्रशासन किंवा कार्यपालिकेला आपले कर्तव्य वेळेत निभावता आले नाही म्हणून सर्वोच्च न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला. आपल्या देशात अनेकदा एक अध्यादेश किंवा प्रशासकीय आदेश जारी करून एका रात्रीत मोठमोठे धोरणात्मक निर्णय घेतले जातात. तेथे विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेण्यासाठी प्रशासनाला इतके दिवस का लागतात? नोकरशाहीची संथ चाल न्यायालयाच्या या हस्तक्षेपाने उघडी पडली आहे. 'एफआयआर' दाखल झाल्यानंतर तो रद्द करण्याची नेहमीची प्रक्रिया अत्यंत किचकट, लांबलचक आणि मानसिक क्लेश देणारी असते. त्यात वर्षांनुवर्षे निघून जातात. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना या प्रक्रियेतून जाण्यास बाध्य करणे ही बाब त्यांचे मनोबल संपविणारी ठरली असती. हा विषय अधिक काळ लालफितशाहीत अडकून राहिला असता तर शैक्षणिक प्रवेशावर, नोकरीच्या संधींवर आणि चारित्र्य पडताळणीवर गुन्हेगारी प्रकरणांची छाया कायम राहिली असती. गृहविभागाकडून कायदा विभागाकडे नस्ती पाठवणे आणि कायदा विभागाकडून पोलिसांना मार्गदर्शक सूचना जारी करणे इत्यादी प्रक्रियेत प्रशासनाने अडीच महिन्यांपेक्षा जास्त वेळ वाया घालवला. अखेर सर्वोच्च न्यायालयाला स्वतःहून हस्तक्षेप करावा लागला ही नोकरशाहीला लावली गेलेली चपराक आहे, हे कथित सनदी वर्तुळाच्या लक्षात आले पाहिजे. प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि तातडीने विद्यार्थ्यांच्या भावना समजून घ्यायला हव्या होत्या. सरकारने आश्वासन दिले होते. पुढचे काम प्रशासनाचे असते. त्यात प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरले. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला असा निर्णय द्यावा लागला.

आंदोलक विद्यार्थ्यांविरुद्ध कोणतीही कठोर कारवाई केली जाणार नाही आणि त्यांच्याविरुद्धचे 'एफआयआर' मागे घेतले जातील, असे आश्वासन केंद्राने दिले होते. हा शब्द सर्वोच्च न्यायालयाने दिलेला नव्हता, तर लोकनिर्वाचित सरकारने दिला होता. एखादे आंदोलन शांत करण्यासाठी किंवा विद्यार्थ्यांच्या नकळत झालेल्या चुका पोटात घेऊन सरकार एखादे आश्वासन देते, तेव्हा त्याची पूर्तता करणे ही प्रशासनाची किंवा नोकरशाहीची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी असते. कारण आदेश किंवा निर्णय नोकरशाही जारी करीत असते. तरीही प्रशासन ढिम्म होते. हजारो तरुण विद्यार्थी मानसिक तणावाखाली होते. सध्याचे केंद्रीय सरकार क्रांतिकारी आणि जलद धोरणात्मक निर्णयांसाठी ओळखले जाते. नोटबंदीसारखा आर्थिक निर्णय असो, कलम ३७० हटवणे असो किंवा रात्रीच्या वेळी अध्यादेश काढून तातडीने कायदे लागू करणे असो, अनेक मोठे निर्णय या सरकारने एका रात्रीत घेतले आहेत. तेव्हा प्रशासनाने सरकारच्या निर्देशांनुसार जलद हालचाली केल्या ना? मग विद्यार्थ्यांना दिलासा देण्यातच विलंब का? या विलंबामुळे आंदोलकांना दिल्लीत पुन्हा ५ सप्टेंबर रोजी मोर्चा काढण्याची घोषणा करावी लागली. या पृष्ठभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने २० ते २५ जुलै दरम्यानच्या आंदोलनाशी संबंधित देशभरातील सर्व 'एफआयआर' तत्काळ रद्द केले आणि पुढील तपास पूर्णपणे बंद केला. या आंदोलनाशी संबंधित घटनावरून कोणत्याही राज्यात नवीन गुन्हे दाखल करण्यास मनाई केली गेली आहे. परीक्षा रद्द झाल्याच्या आघातामुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना ३ महिन्यांत आर्थिक भरपाई देण्याचे निर्देश दिले गेले आहेत. लाठीमारात किंवा पोलिस कारवाईत जखमी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मदत व नुकसानभरपाई योजना तयार करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. ज्यांच्यावर गंभीर हिंसाचार किंवा गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आरोप आहेत, त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाईची मुभाही सर्वोच्च न्यायालयाने प्रशासनाला दिलेली आहे. हे सारे सर्वोच्च न्यायालय करू शकले. कारण ते संवेदनशील आहे. शिव्याशाप पचवूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मनाचा मोठेपणा दाखविला आणि विद्यार्थ्यांना माफ केले होते. सरकारतर्फे आंदोलकांना शब्द दिला गेला होता. अशा स्थितीत नोकरशाहीने अधिक सकारात्मक होऊन तातडीने विषय मार्गी लावणे अपेक्षित होते. आता सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे 'कॉक्रोच जनता पार्टी' आणि इतर विद्यार्थी संघटनांनी ५ सप्टेंबरचा मोर्चा मागे घेतला हे चांगले झाले. पण, याचे श्रेय सर्वोच्च न्यायालयाचे आहे, हे विसरता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलले असले, तरी त्याने नोकरशाही व प्रशासनाच्या असंवेदनशील वर्तनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या प्रकरणातून धडा घेऊन, भविष्यात अशा घटना घडल्यास नोकरशाहीला न्यायालयाची चपराक बसेपर्यंत सरकारने वाट पाहू नये. सरकार आणि प्रशासन या दोघांनीही स्वतःहून पुढाकार घेऊन गरजूंना न्याय दिला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने एकप्रकारे हा निर्णय देऊन सरकारला मदत केलेली आहे आणि आंदोलनाची घोषणा मागे घेण्यासाठी वातावरण निर्मिती केली आहे. एकीकडे न्यायालयांच्या सक्रियतेला नोकरशाही नावे ठेवते. दुसरीकडे नोकरशाहीला स्वतःच्या जबाबदाऱ्या नीट पार पाडता येत नाहीत. नोकरशाही ही शासनाची अर्थात सरकारची लोकांना प्रत्यक्ष दिलासा देणारी यंत्रणा असते. ती इतक्या लायकीची असेल तर तिला धारेवर धरण्याची आणि कामाला लावण्याची जबाबदारी सरकारची आहे. असंघटित क्षेत्रातील लोक अल्प वेतनात दिवस काढत असताना वेतन आयोगांचे अफाट फायदे घेणाऱ्या व त्यासाठी सतत आणि वेगाने कार्यरत असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली जाईल आणि त्यांना ते लक्षात येईल, तो सुदिन. नोकरशाहीतील लक्षावधी रत्नांना नागरिकांच्या पैशातून पोसणे न्याय्य आहे, हे कधी तरी सिद्ध व्हावे, एवढीच सामान्यांची अपेक्षा आहे. ■

तंत्रवेध

कृत्रिम बुद्धिमत्तेची नवी पिढी

डॉ. दीपक शिकारपूर

काही वर्षांपूर्वी कृत्रिम बुद्धिमत्तेशी संवाद साधणे हीच मोठी गोष्ट वाटत होती. प्रश्न विचारला की उत्तर मिळायचे, लेख लिहून मिळायचा, भाषांतर व्हायचे किंवा एखाद्या विषयाची माहिती मिळायची. आजही ही सुविधा अत्यंत उपयुक्त आहे, पण आता कृत्रिम बुद्धिमत्तेची वाटचाल त्याही पुढे सुरू झाली आहे. ती केवळ प्रश्नांची उत्तरे देणारी राहिलेली नाही, तर स्वतः नियोजन करणारी, निर्णय घेणारी, अनेक टप्प्यांमध्ये काम पूर्ण करणारी आणि आवश्यक तेव्हा इतर साधनांचा वापर करून उद्दिष्ट पूर्ण करणारी बनत आहे. यालाच 'स्वयंकर्ती कृत्रिम बुद्धिमत्ता' म्हणजेच 'एजेंटिक एआय' असे म्हणता येईल. ही प्रणाली काही प्रमाणात मानवी मेंदूप्रमाणे कार्य करते. ती सतत शिकत राहते, बदलत्या परिस्थितीनुसार स्वतःला जुळवून घेते आणि आवश्यकतेनुसार इतर बुद्धिमान प्रणालींसोबत सहकार्यदेखील करू शकते. त्यामुळे डिजिटल सहकार्याचे स्वरूप पूर्णपणे बदलण्याची क्षमता या तंत्रज्ञानात आहे. पारंपरिक एआय आणि एजेंटिक एआय यांच्यातील फरक अत्यंत महत्त्वाचा आहे. पारंपरिक प्रणाली मानवी आदेशांवर अवलंबून असते, तर एजेंटिक प्रणाली स्वतंत्रपणे काम करू शकते. पारंपरिक प्रणाली पूर्वनियोजित नियमांनुसार कार्य करते, तर एजेंटिक प्रणाली अनुभवातून शिकते आणि परिस्थितीनुसार निर्णय बदलू शकते. पारंपरिक प्रणाली साधी आणि पुनरावृत्तीची कामे उत्तम प्रकारे करते, परंतु एजेंटिक प्रणाली जटिल आणि बहुपदरी कामे हाताळू शकते.

एजेंटिक कृत्रिम बुद्धिमत्तेतील सर्वांत महत्त्वाची संकल्पना म्हणजे 'ऑटोनॉमस एजंट्स'. ते केवळ आदेश पाळत नाहीत, तर परिस्थिती समजून घेतात, नियोजन करतात, माहिती गोळा करतात, पर्यायांचे विश्लेषण करतात आणि योग्य कृतीही करतात. उदाहरणार्थ, एखाद्या उद्योगाने 'ग्राहक समाधान वाढवा' असे उद्दिष्ट दिल्यास ऑटोनॉमस एजंट्स ग्राहकांच्या प्रतिक्रिया तपासतील, तक्रारींचे वर्गीकरण करतील, स्पर्धकांचा अभ्यास करतील, सुधारणा सुचवतील आणि आवश्यक असल्यास ग्राहकांशी संवादही साधतील. शिक्षणक्षेत्रात असे प्रतिनिधी विद्यार्थ्यांच्या अभ्यासपद्धतीचे विश्लेषण करून वैयक्तिक अभ्यास आराखडा तयार करू शकतात, सराव चाचण्या घेऊ शकतात आणि कमकुवत विषयांवर विशेष मार्गदर्शन करू शकतात. भविष्यात अनेक ऑटोनॉमस एजंट्स एकत्र काम करून मोठी आणि जटिल कामे पूर्ण करतील. त्यामुळे उद्योग, संशोधन, आरोग्य, बँकिंग आणि शिक्षणक्षेत्र अधिक गतिमान, अचूक आणि कार्यक्षम बनतील. ही कृत्रिम बुद्धिमत्तेची पुढील पिढी आहे. आजचा बदल हा केवळ तांत्रिक नाही, तर काम करण्याच्या पद्धतीत आमूलाग्र परिवर्तन घडवणारा आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, उद्योगपती, व्यावसायिक आणि कर्मचारी यांनी या नव्या युगाची ओळख करून घेणे अत्यावश्यक आहे.

आज आपण कृत्रिम बुद्धिमत्तेला एखादा प्रश्न विचारतो आणि उत्तर मिळवतो. पण समजा, 'माझ्या संस्थेसाठी पुढील सहा महिन्यांचा विकास आराखडा तयार कर, आवश्यक माहिती गोळा कर, खर्चाचा अंदाज काढ, सादरीकरण तयार कर आणि शेवटी कृती आराखडाही बनव.' अशी आज्ञा दिली तर ती फक्त उत्तर देत नाही, तर अनेक टप्प्यांमध्ये विचार करते, माहिती तपासते, आवश्यक साधनांचा वापर करते आणि संपूर्ण काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करते.

हीच स्वयंकर्ती कृत्रिम बुद्धिमत्ता आहे. म्हणजेच ही प्रणाली केवळ संवाद साधत नाही, तर उद्दिष्ट समजून घेते, कामाचे छोटे भाग करते, प्रत्येक भाग पूर्ण करते, अडचणी आल्यास पर्याय शोधते आणि शेवटी अपेक्षित परिणाम देते. यामुळे ती एखाद्या बुद्धिमान सहायकापेक्षा अधिक सक्षम सहकारी बनते. यामुळे कार्यालयांचे स्वरूप झपाट्याने बदलणार आहे. आज एखादा कर्मचारी दिवसभर विविध लहानमोठी कामे करतो. माहिती गोळा करणे, अहवाल तयार करणे, ग्राहकांना उत्तर देणे, बैठकींची तयारी करणे, आकडेवारी तपासणे, माहितीची पडताळणी करणे आणि नियोजन करणे यासाठी बराच वेळ जातो. स्वयंकर्ती कृत्रिम बुद्धिमत्ताही अनेक कामे काही मिनिटांमध्ये पूर्ण करू शकते. त्यामुळे माणसाकडे विचार, कल्पना, नेतृत्व आणि निर्णय यासाठी अधिक वेळ उपलब्ध होईल. उद्योगक्षेत्रात तिचा उपयोग अधिक व्यापक असेल. उत्पादन नियोजन, साठा व्यवस्थापन, ग्राहकांच्या मागणीचा अंदाज, पुरवठा साखळीचे नियोजन, गुणवत्ता नियंत्रण आणि खर्च कमी करण्यासाठी ती सतत काम करू शकेल.

इथे स्वयंकर्त्या कृत्रिम बुद्धिमत्तेची मूलभूत तत्त्वे समजून घ्यावी लागतील. कृत्रिम बुद्धिमत्ता कसा विचार करते, माहिती कशी वापरते, तिच्या मर्यादा काय आहेत आणि योग्य सूचना कशा द्यायच्या हे शिकणे आवश्यक आहे. त्यानंतर प्रत्यक्ष वापर सुरू करता येईल. रोजच्या कामांमध्ये तिची मदत घेणे. पत्र लिहिणे, अहवाल तयार करणे, माहितीचे विश्लेषण करणे, अभ्यासाचे नियोजन, कल्पनांचा विस्तार आणि समस्या सोडवणे यासाठी तिचा उपयोग करता येईल. देशातील अनेक विद्यापीठे, तंत्रज्ञान शिक्षण संस्था, कौशल्य विकास केंद्रे आणि संशोधन संस्था कृत्रिम बुद्धिमत्तेवरील अभ्यासक्रम सुरू करत आहेत. शासनाच्या विविध कौशल्य विकास उपक्रमांमधूनही प्रशिक्षण उपलब्ध होत आहे. याशिवाय अनेक मुक्त अध्ययन व्यासपीठांवर विनामूल्य अभ्यासक्रम, व्याख्याने आणि प्रात्यक्षिके उपलब्ध आहेत. नियमित वाचन, तज्ज्ञांची व्याख्याने, चर्चासत्रे आणि प्रत्यक्ष प्रयोग यांद्वारेही या क्षेत्रात प्रगती करता येते. जगाला केवळ तंत्रज्ञान वापरणारे लोक नको आहेत, तर नवे उपाय निर्माण करणारे विचारवंत, संशोधक आणि उद्योजक हवे आहेत. आपल्या मातृभाषांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास करणेही तितकेच आवश्यक आहे. गावागावातील विद्यार्थी, शेतकरी, लघुउद्योजक आणि सामान्य नागरिक यांच्यापर्यंत या तंत्रज्ञानाचे लाभ पोहोचले, तरच त्याचे खरे सामर्थ्य दिसून येईल. स्वयंकर्ती कृत्रिम बुद्धिमत्ता ही केवळ नवीन तंत्रज्ञान नाही; ती काम करण्याची, विचार करण्याची आणि भविष्य घडवण्याची नवीन पद्धत आहे. या परिवर्तनाचे स्वागत ज्ञानाने, कौशल्याने आणि जबाबदारीने करायला हवे. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

वेध

नीलेश जोशी

कर्तव्याचे भान हरवतेय् का?

मूलभूत अधिकारांसह विविध अधिकारांची चर्चा नेहमीच होते. लोकशाही मजबूत होण्यासाठी नागरिकांना आपल्या अधिकारांची जाणीव असणे आवश्यकच आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समानतेचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, माहितीचा अधिकार, कायद्याचे संरक्षण, मतदानाचा अधिकार, सार्वजनिक सुविधांचा लाभ घेण्याचा अधिकार या सर्व अधिकारांमुळे नागरी व्यवस्था अधिक सक्षम झाली आहे. गत काही दशकांत सामान्य माणूस स्वतःच्या अधिकारांबाबत पूर्वीपेक्षा अधिक जागरूक झाल्याचे देखील दिसून येते. म्हणूनच अन्याय झाला तर प्रश्न विचारायचा, कार्यालयीन काम अडले तर जाब विचारायचा, सरकारी यंत्रणांना नागरी सुविधांची विचारणा करायची, चुकीच्या धोरणाविरोधात आवाज उठवायचा, हा सामान्य नागरिकांमध्ये सकारात्मक बदल झाला आहे. पण एकीकडे अधिकारांची जाणीव दृढ होत असतानाच दुसरीकडे कर्तव्याचे भान तुम्हा-आम्हाला आहे का, अधिकारांप्रमाणेच कर्तव्याचीही जाणीव वाढते आहे का? रस्ते स्वच्छ हवेत, पण कचरा कुठे टाकायचा याचे भान नाही. वाहतूक व्यवस्था चांगली हवी, पण वाहतुकीचे नियम पाळायचे नाहीत. पादचाऱ्यासाठी पदपथ हवेत, पण सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करायचे किंवा त्याकडे दुर्लक्ष करायचे. शासनाकडून मुबलक पाण्याची अपेक्षा करायची पण पाण्याचा अपव्यय थांबवायचा नाही. कराच्या पैशातून विकास हवा, पण कर भरण्याची वेळ आली की पळवाट शोधायची. ही विसंगती असेपर्यंत विकसित राष्ट्राची अपेक्षा करावी तरी कशी, याचा विचार करावा लागेल.

शहरांसह ग्रामीण भागात देखील अतिक्रमणाची समस्या आहे. रस्त्याच्या दुतर्फा नियोजित पादचारी मार्गावर तर हमखास अतिक्रमण केलेले आढळते. पण मुळात हे अतिक्रमण करणारे आणि त्याला कळत-नकळत मान्यता देणारे या समाजाचे घटकच आहेत ना? वाहतूक नियमांच्या बाबतीतही अशीच परिस्थिती आहे. सिग्नल तोडणे, हेल्मेट न वापरणे, सीटबेल्ट न लावणे, चुकीच्या दिशेने वाहन चालवणे, वाहन चालवताना मोबाईल वापरणे या कृतींना काही जण 'छोटी चूक' समजतात. परंतु अशा छोट्या चुका अनेकदा मोठ्या अपघाताचे कारण ठरतात. रस्त्यावर सुरक्षित प्रवास हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. पण इतरांच्या सुरक्षिततेचा विचार करून नियम पाळणे हे नागरिकाचे कर्तव्य नव्हे का?

स्वच्छतेच्या बाबतीत तर आपल्या शहरात आपल्याच मानसिकतेचे प्रतिबिंब स्पष्ट दिसते. स्वच्छ भारत, स्वच्छ शहर, कचरामुक्त परिसर अशा मोहिमा राबवल्या जातात. प्रशासन साफसफाई करते, कर्मचारी रस्ते झाडतात. पण काही तासांतच पुन्हा कचरा साचतो. कारण स्वच्छता ही केवळ सफाई कर्मचाऱ्यांची जबाबदारी आहे, अशीच अनेकांची धारणा असते. निसर्गाच्या लहरीपणाबाबत अनेक जण तासनतास गप्पा करतात. यावेळी पर्यावरणाचा ऱ्हास यावर तावातावाने आपले मत मांडणारेही आहेत. पण पर्यावरणाच्या संवर्धनासाठी प्रत्यक्ष पुढाकार घेऊन काम करणारे किती टक्के नागरिक असतील. सार्वजनिक स्तरावर मोठ्या प्रमाणात काम करणे सोडा, किती जणांचा वैयक्तिक व्यवहार पर्यावरणपूरक आहे. शहरात नाल्या तुंबल्या म्हणून रस्त्यावर गटाराचे पाणी आहे. असा ओरडा करणारी व्यक्तीच भाजीबाजार, किराणा दुकानातून विकत घेतलेल्या वस्तू दुकानदाराला निर्बंध असलेल्या प्लॅस्टिकच्या पिशवीत मागते. याच प्लॅस्टिकच्या पिशव्यांच्या दुष्परिणामांपैकी एक दुष्परिणाम शहरातील नाल्या तुंबण्यात होते. हे कटु सत्य नव्हे का? सामान्यजनांमध्ये आपल्या अधिकारांची जाणीव असायलाच हवी पण सोबतच कर्तव्याचे भान देखील आवश्यक आहे. विकसित राष्ट्र निर्माणाची जबाबदारी केवळ सत्तेतील पुढाऱ्यांचीच नव्हे तर देशातील प्रत्येक नागरिकाची आहे. स्वातंत्र्यापूर्वी महान देशभक्त आणि विचारवंत लोकमान्य टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर यांचा मोठा वैचारिक वाद झाला होता. आधी राजकीय स्वातंत्र्य की आधी सामाजिक सुधारणा असा तो विषय होता. याची व्याप्ती मोठी आहे. आता आपण स्वतंत्र होऊन ८० वर्षे होत आहेत. आणि दुर्दैव म्हणजे देशातील समाज शिक्षित होऊनही अपेक्षित सामाजिक सुधारणा अर्थात देश, समाजाप्रति कर्तव्याची भावना बळकट झाली नाही. असे अनेक घटनांवरून म्हणावेसे वाटते. आपल्या हक्काचे आपल्याला मिळावेच पण आपले कर्तव्य काय आहे, याचीही जाण आणि भान प्रत्येकाने ठेवावे यावर भविष्यात केवळ चिंतन नको तर प्रत्यक्ष कृती आवश्यक आहे. ■

९४२२८६२४८४

दिल्ली वार्तापत्र

संसदेचे विशेष अधिवेशन केव्हा?

श्यामकांत जहागीरदार

संसदेचे पावसाळी अधिवेशन संस्थगित झाल्याची अधिसूचना अद्याप जारी न झाल्यामुळे महिला आरक्षण आणि मतदारसंघाचे परिसीमन या मुद्यावर संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले जाण्याची शक्यता आहे. सामान्यपणे संसदेच्या कोणत्याही अधिवेशनाचे सूप वाजल्यानंतर ते अधिवेशन संस्थगित झाल्याची अधिसूचना राष्ट्रपती काढत असतात, यावेळी मात्र राष्ट्रपती भवनाने अशी अधिसूचना जारी केली नाही. अधिवेशन संस्थगित झाल्याची अधिसूचना निघत नाही तोपर्यंत संसदेचे अधिवेशन अधिकृतपणे संपले असे मानले जात नाही. त्यामुळे संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची चर्चा जोरात आहे.

सप्टेंबरमध्ये दोन-तीन दिवसांचे हे विशेष अधिवेशन होईल, असा अंदाज आहे. नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होईल. हिवाळी अधिवेशनात ही दोन्ही विधेयके मांडण्याचा सरकारचा विचार असता तर संसदेचे पावसाळी अधिवेशन संस्थगित करता आले असते, पण हे अधिवेशन अद्याप संस्थगित न झाल्यामुळे हिवाळी अधिवेशनाच्या आधी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याचा विचार सरकारने अद्याप सोडला नाही, असा काढता येतो. सरकारच्या दृष्टीने ही दोन्ही घटनादुरुस्ती विधेयके महत्त्वपूर्णच नाहीत तर प्रतिष्ठेचीही आहेत. त्यामुळे सरकार काहीही झाले तरी ही दोन घटनादुरुस्ती विधेयके पारित करून घेईल, यात शंका नाही. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी एका मुलाखतीत संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याचे संकेत दिले आहेत. काँग्रेसलाही सरकार या मुद्यावर संसदेचे विशेष अधिवेशन बोलवेल, असा अंदाज आहे. मतदारसंघाच्या परिसीमनाला विरोध करत पुढील २५ वर्ष लोकसभेच्या ५४३ जागा कायम ठेवण्याची मागणी काँग्रेसने केली असली तरी सरकार ही मागणी मान्य करण्याची कोणतीच शक्यता नाही. उलट काँग्रेसने अशी मागणी केल्यामुळे ही दोन्ही विधेयके लवकरात लवकर पारित करून घेण्याचा सरकारचा निर्धार आणखी दृढ झाला आहे. त्यामुळेच काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यापूर्वी सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची तसेच या दोन्ही विधेयकांचा मसुदा विरोधकांना उपलब्ध करून देण्याची मागणीही केली आहे.

मतदारसंघाच्या परिसीमनाला काँग्रेसचा विरोध असला तरी महिला आरक्षणाला आपला विरोध नाही, हे दाखवण्यासाठी काँग्रेसने २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू करण्याची मागणी केली आहे. लोकसभेच्या ५४३ या विद्यमान सदस्य संख्येतच महिला आरक्षण लागू करण्याची काँग्रेसची मागणी आहे. महिला आरक्षणांसदर्भातील घटनादुरुस्ती विधेयक सरकारने आधीच पारित केले आहे. महिला आरक्षण आणि मतदारसंघाचे परिसीमन ही दोन्ही घटनादुरुस्ती विधेयके आहेत, त्यामुळे संसदेत ती पारित करण्यासाठी दोनतृतीयांश बहुमताची आवश्यकता असते. एप्रिल महिन्यात म्हणजे संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर ही दोन्ही घटनादुरुस्ती विधेयके पारित करण्यासाठी सरकारने तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावले होते. मात्र सरकारला तेव्हा दोनतृतीयांश बहुमत जमवता न आल्यामुळे ही दोन्ही विधेयके लोकसभेत फेटाळली गेली होती. एकप्रकारे त्यावेळी सरकारचा पराभव झाला होता. त्यामुळे सरकार यावेळी कोणताही धोका पत्करण्याच्या मनःस्थितीत नाही. दुसऱ्यांदा ही घटनादुरुस्ती विधेयके फेटाळली जाणे सरकारला राजकीयदृष्ट्या परवडणारे नाही. त्यामुळे यावेळी आपल्याजवळ दोनतृतीयांश बहुमत जमले आहे, याची पूर्ण खात्री झाल्यावर सरकार लगेच संसदेचे दोन-तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलवेल, असा अंदाज आहे.

एप्रिलनंतर देशातील राजकीय परिस्थितीत मोठा बदल झाला आहे. विशेष म्हणजे तामिळनाडूतून द्रमुक सत्तेबाहेर गेला आहे. तामिळनाडूतील घटनाक्रमाने भाजपा आणि रालोआचे मनोबल उंचावले आहे. तामिळनाडूत भाजपाची सत्ता आल्यावरही जेवढा राजकीय फायदा भाजपाचा झाला नसता त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त फायदा तेथे टीव्हीकेची सत्ता आल्यामुळे भाजपाचा झाला आहे. राज्यात टीव्हीकेला स्पष्ट बहुमत न मिळाल्यामुळे त्याला सरकार स्थापन करण्यासाठी काँग्रेसचा पाठिंबा घ्यावा लागला.

आज द्रमुक इंडिया आघाडीतून बाहेर पडला असला तरी तो सध्या पूर्णपणे रालोआकडे झुकला नाही. एप्रिलच्या विशेष अधिवेशनात महिला आरक्षण आणि मतदारसंघाच्या परिसीमानाबाबतचे घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत फेटाळण्यामागे काँग्रेसचा मित्रपक्ष म्हणून द्रमुकची मोठी भूमिका होती. द्रमुकचा आता या दोन्ही विधेयकांना पहिलेसारखा विरोध राहिला नाही. द्रमुककडून अद्याप सरकारला याबाबतचे स्पष्ट आश्वासन मिळाले नाही. त्यामुळे विशेष अधिवेशन बोलावण्याबाबतचा अंतिम निर्णय सरकारला करता येत नाही. ज्यादिवशी द्रमुक या दोन्ही घटनादुरुस्ती विधेयकांना आपला पाठिंबा जाहीर करेल, त्याच्या दुसऱ्या दिवशी सरकार विशेष अधिवेशन बोलावेल, यात शंका नाही. या दोन्ही विधेयकांना जाहीर पाठिंबा देणे द्रमुकला राजकीयदृष्ट्या शक्य नसेल तर या दोन्ही घटनादुरुस्ती विधेयकावरील मतदानाच्या वेळी द्रमुक सरकाचा निषेध करत सभात्याग करू शकतो वा मतदानाच्या वेळी सभागृहात अनुपस्थितही राहू शकतो. कारण दोनतृतीयांश बहुमत हे सभागृहात त्यावेळी उपस्थित सदस्यसंख्येच्या प्रमाणात असते. दुसरीकडे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संख्याबळातही मोठी वाढ झाली आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडली आहे. २० खासदार या पक्षातून बाहेर पडले. शिवसेना उबाठाचे सहा खासदार शिवसेना एकनाथ शिंदे गटात आले आहेत. आम आदमी पक्षाचे सात राज्यसभा सदस्यही भाजपात सहभागी झाले आहेत. बिजू जनता दलाचे काही राज्यसभा सदस्यही भाजपात सहभागी झाले आहेत. त्यामुळे लोकसभेसोबत राज्यसभेतही भाजप बहुमताच्या जवळ पोहोचला आहे. काँग्रेसने आपल्या भूमिकेत बदल केला नाही तर काँग्रेसला वगळून अन्य विरोधी पक्षांना आपल्याकडे वळवण्याचा सरकारचा प्रयत्न राहू शकतो. एप्रिल महिन्यातील विशेष अधिवेशनात सभागृहातील फ्लोअर मॅनेजमेंटच्या मुद्यावर मोदी सरकारकडून अतिआत्मविश्वासासोबत काही चुकाही झाल्या होत्या. यावेळी मात्र सरकारने आपल्या सर्व चुका दुरुस्त केल्या आहेत. यावेळी सरकार दोनतृतीयांश बहुमत जमवण्याच्या बाबतीत प्रत्येक पाऊल सावधपणे टाकत आहे. त्यामुळे यावेळी ही दोन्ही घटनादुरुस्ती विधेयके पारित होण्यात कोणती अडचण येईल, असे वाटत नाही. गेल्या काही दिवसांपासून मंत्रिमंडळ विस्ताराची सातत्याने चर्चा सुरू आहे. पण मंत्रिमंडळ विस्ताराचे गाडे महिला आरक्षण आणि मतदारसंघाचे परिसीमन या दोन्ही घटनादुरुस्ती विधेयकांमुळे अडले आहे. जोपर्यंत ही दोन्ही घटनादुरुस्ती विधेयके पारित होणार नाहीत, तोपर्यंत मंत्रिमंडळाचा विस्तार होणार नाही, असे मानले जात आहे. ज्यादिवशी ही दोन्ही विधेयके पारित होतील, त्याच्यानंतर आठवडाभरातच मंत्रिमंडळाचा विस्तार होऊ शकतो. ■

९८८१७१७८१७

आद्यकवी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज जयंती

मानवतेचे मूल्य समाजाला देणारे, ज्ञानीयांचा राजा, वेदांचा ज्ञाता, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज हे तेराव्या शतकातील प्रसिद्ध आद्य श्रेष्ठ संतकवी होते. त्यांचा जन्म २२ ऑगस्ट १२७५ साली श्रावण कृष्ण अष्टमीला आपेगाव, पैठण येथे झाला. यावर्षी दिनांकानुसार ४ सप्टेंबर रोजी संत ज्ञानेश्वर महाराजांची जयंती आहे. निवृत्तिनाथ हे संत ज्ञानेश्वर यांचे गुरू. निवृत्तिनाथांना नवनाथांपैकी श्री गहिनीनाथ यांनी दीक्षा दिली होती. त्यामुळे ज्ञानेश्वर हे नाथ संप्रदायाच्या शिष्य परंपरेतील होते. तसेच त्यांनी वारकरी वैष्णव भक्ती परंपरेची मुहूर्तमेढ रोवली. 'ज्ञाना रचिला पाया तुका केलासे कळस' हे सार्थ झाले. ज्या वारकरी संप्रदायाचे आज आपण विराट स्वरूप बघतो आहोत, त्याचा पाया ज्ञानेश्वरांनी रचला आणि बाकी संतश्रेष्ठांसह तुकाराम महाराजांनी त्याला अत्युच्च शिखरावर नेले. संत ज्ञानेश्वर महाराजांना महाराष्ट्रात भक्तिभावाने माउली म्हटले जाते. ते सतत विठ्ठलभक्तीत लीन असायचे. त्यांनी संस्कृत भाषेतील भगवद्गीता प्राकृत मराठीत लिहून ज्ञानाचे दरवाजे सर्वसामान्यांसाठी खुले केले. तीच भावार्थदीपिका म्हणजे ज्ञानेश्वरी लिहिली. त्यांनी पसायदान लिहिले ते संपूर्ण जगाच्या कल्याणाकरिताच. जो जे वांछिल! तो ते लाहो! प्राणिजात! हेच त्यांचे ध्येय होते. केवळ मनुष्यच नव्हे, तर प्राणी, पक्षी, झाडे सर्व सुखी आणि आनंदी असावे असेच त्यांचे ईश्वराकडे मागणे होते. असे हे संतश्रेष्ठ कवी आपल्या महाराष्ट्रात जन्माला आले यासारखे दुसरे भाग्य ते काय!

त्यांचे अभंग आणि पसायदान हे लता मंगेशकर यांनी गाऊन ते प्रत्येक घराघरात पोहोचवले. एवढा अमूल्य ठेवा समाजाला देऊन ते विरक्तच राहिले. देवाचिये द्वारी उभा क्षणभरी! हरी मुखे म्हणा! हरी मुखे म्हणा! पुण्याची गणना कोण करी! हरी मुखे म्हणा याचा अर्थ अखंड नामस्मरण करण्याचा प्रयत्न करा, असे माउलींनी सांगितले आहे. तीच कलियुगातील सर्वश्रेष्ठ साधना आहे. ज्ञानेश्वर माउलींच्या चरणी कोटी कोटी कृतज्ञता.

माधवी पत्की/नागपूर

वाचक पत्रे

■■■

ग्लोबल वॉर्मिंगचा विळखा आणि हिमालयाची हाक

आज हिमालयाच्या कुशीत घडणाऱ्या घडामोडी आपल्याला एका मोठ्या संकटाची चाहूल देत आहेत. नुकतीच तिबेट आणि नेपाळच्या सीमावर्ती भागात ग्लेशियर तुटल्यामुळे आलेल्या महाप्रलयात मोठी जनहानी झाली. या दुर्घटनेत चीनच्या पूर्वसूचना यंत्रणेच्या मर्यादा पुन्हा एकदा उघड्या पडल्या असून, वेळेवर अलर्ट न मिळाल्याने मोठा अनर्थ ओढवला. विशेष म्हणजे, या आपत्तीनंतर तिथे निर्माण झालेले दोन नवीन नैसर्गिक तलाव कधीही फुटण्याची शक्यता असल्याने नेपाळसह संपूर्ण परिसर अद्याप धोक्यात आहे. नेपाळ आणि तिबेटमधून वाहणाऱ्या नद्या थेट भारताच्या दिशेने येतात. या संकटामुळे भारताच्या उत्तर आणि पूर्व भागातील जलसुरक्षेवर मोठा धोका निर्माण झाला आहे. शेजारी घडणाऱ्या या घटनांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, कारण उद्या आपल्याही सीमावर्ती राज्यांमध्ये असे जलप्रलय उभे ठाकण्याचा धोका अटळ आहे.

आज हिमालयात जे घडतंय, ती कोणतीही साधी दुर्घटना नसून ही खऱ्या अर्थाने आपत्काळाची सुरुवात आहे. आपल्या पूर्वजांनी निसर्गाप्रति कृतज्ञता म्हणून त्याला दिलेले देवत्व आणि संस्कार आपण विसरलो आहोत. निसर्गाशी प्रतारणा केल्यास विध्वंस घडू शकतो, ही त्यांनी केलेली भविष्यवाणी आता खरी ठरू लागली आहे. आज मानवाने विकासाच्या नावाखाली निसर्गाला ओरबाडणे चालवले आहे. माणसाचा लोभ वाढलाय आणि त्याची निसर्गाशी असलेली नाळ तुटली आहे. निसर्गाच्या विरोधात जाऊन केलेली कोणतीही कृती आज आपल्याला महागात पडत आहे. पृथ्वीला वाचवायचे असेल, तर आपल्याला आपली जीवनशैली बदलावी लागेल. आज निसर्गाच्या या प्रकोपामुळे भौतिक जगताच्या मर्यादा उघड्या पडल्या आहेत. अशा या भीषण संकटात माणसाला केवळ आणि केवळ परमेश्वराची भक्ती, साधना आणि अध्यात्मच तारून नेऊ शकते. नित्य साधना आणि ईश्वरावर अगाध श्रद्धा हीच संकटाच्या काळात माणसाला मानसिक बळ देणारी खरी कवचकुंडले आहेत. जेव्हा मानवाचे विज्ञान आणि तंत्रज्ञान अपुरे पडेल, तेव्हा केवळ ईश्वरी कृपा आणि आध्यात्मिक बलच आपल्याला या महाविनाशापासून वाचवू शकेल. हिमालयाचे हे अक्राळविक्राळ स्वरूप वेळीच ओळखा, अन्यथा हा रोष संपूर्ण मानवासाठी एका महाविनाशाची सुरुवात ठरेल! ■

वर्षा आवदे/ नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ परभणीत कडकडीत बंद

सकल मराठा समाजातर्फे आवाहन : जिल्ह्यात अन्यत्रही आंदोलन

परभणी,/प्रतिनिधी:- संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी जालना जिल्ह्यातील अंतरवेली सराटी या गावी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरु केलेल्या बेमुदत उपोषणाच्या समर्थनार्थ परभणी शहरासह जिल्ह्यात पुकारण्यात आलेल्या जिल्हा बंद आंदोलनास शहरासह जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सकल मराठा समाजाच्या वतीने बुधवारी (दि.०२) जिल्हा पोलिस अधिक्षक कुमावत यांना परभणी जिल्हा बंद संदर्भात निवेदन सादर करण्यात आले होते. गुरुवारी सकाळी सकल मराठा समाजाच्या काही बांधवांनी मोटारसायकल रॅली काढून शहरांतर्गत मध्यवस्तीसह चोहोबाजूंच्या वसाहतीतील व्यापाऱ्यांना व्यवहार बंद ठेवण्याची आवाहन केले. या बंदला व्यापारी, व्यावसायिक तसेच विविध घटकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. परभणी शहरासह जिल्ह्यातील शैक्षणिक संस्था, अनेक भागांत प्रमुख बाजारपेठा, दुकाने व व्यावसायिक आस्थापने बंद ठेवण्यात आले. त्यामुळे व्यापारीपेठांमधून दुपारी उशीरापर्यंत कमालीचा शुकशुकाट होता.

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी भावना आंदोलनकर्त्यांकडून व्यक्त करण्यात आली. परभणी जिल्ह्यात बंदला मिळालेला प्रतिसाद हा मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी असलेल्या एकजुटीचे आणि आंदोलनाला मिळणाऱ्या व्यापक पाठिंब्याचे द्योतक असल्याचे समन्वयकांनी सांगितले.

देवस्थान इनाम जमिनींच्या प्रश्नावर एकसूत्रता आणा : कृती समितीची मागणी : मुख्यमंत्री व महसुलमंत्र्यांना निवेदन

परभणी,/प्रतिनिधी : देवस्थान इनाम जमिनींसंदर्भातील नियमांमध्ये संपूर्ण राज्यात एकसूत्रता आणावी, वर्ग-२ व वर्ग- ३ संवर्गातील जमिनींचे वर्ग-१ मध्ये रूपांतर करावे, सर्वसामान्य शेतकऱ्यांप्रमाणे देवस्थान इनाम जमीनधारकांना सर्व शासकीय योजनांचा लाभ द्यावा तसेच वारस नोंदीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, अशी मागणी देवस्थान इनाम जमीन कृती समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात आली आहे.

देवस्थान कृती समितीचे ॲड. श्रीपाद कोंत, रामेश्वर पुरी, राजकुमार ठोके, अवधूत गिरी, गणेश दीक्षित, रमेश ठाकूर, प्रेमप्रकाश भारती, वैभव पाटील, बाळाभाऊ गिरी, माणिक गिरी, दयानंद भारती, नारायण परबत, अशोक पुजारी, संदीप ठाकूर, दत्ता गिरी, गंगाधर गिरी, रवी पुरी, मधुकर गिरी, दौलत गिरी, सखाराम सोनटक्के आदींच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना एक तपशीलवार निवेदन सादर केले. त्यात्रे, देवस्थान इनाम जमिनींच्या प्रश्नावर शासनाने स्पष्ट, कायदेशीर आणि एकसमान धोरण निश्चित करावे, अशी मागणी केली. मागील अनेक वर्षांपासून देवस्थान इनाम जमीनधारकांच्या विविध समस्या प्रलंबित असून, त्याचा फटका संबंधित शेतकरी आणि त्यांच्या वारसांना बसत आहे. त्यामुळे या प्रश्नांची तातडीने सोडवणूक करण्याची आवश्यकता असल्याचे कृती समितीने नमूद केले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात देवस्थान इनाम जमिनींसाठी एकच कायदेशीर व प्रशासकीय पद्धत लागू करावी, अशी आग्रही मागणीही करण्यात आली आहे.

जोगळेकर मॅन्युअलमधील परिच्छेद ५१ च्या अनुषंगाने देवस्थान इनाम जमिनींच्या हक्कांचा प्रश्नही निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. जुन्या इनाम जमिनींबाबत शासनाकडून वेळोवेळी करण्यात आलेल्या विविध कार्यवाहीमुळे निर्माण झालेल्या अडचणी दूर करून मूळ इनामधारकांना त्यांच्या हक्काच्या जमिनी मिळाव्यात, अशी मागणी समितीने केली आहे. तसेच अल्पसंख्याक समाजातील देवस्थान इनाम जमीनधारक आणि त्यांच्या वारसांना धार्मिक सेवा सुरू ठेवण्यासाठी आवश्यक कायदेशीर संरक्षण देण्यात यावे. तसेच देवस्थान इनाम जमिनींवर अतिक्रमण करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करून संबंधित जमीनधारकांचे हक्क अबाधित ठेवावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे. देवस्थान इनाम जमिनींच्या प्रश्नावर शासनाने तातडीने उच्चस्तरीय बैठक घेऊन राज्यभरासाठी एकसमान धोरण निश्चित करावे. जमीनधारकांच्या प्रलंबित प्रश्नांची कायदेशीर पद्धतीने सोडवणूक करून त्यांना महसूल नोंदी, वारस हक्क आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी देवस्थान इनाम जमीन कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे. काही ठिकाणी राजकीय दबावामुळे महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कायद्यातील तरतुदींना बगल देत चुकीचे फेरफार व नोंदी करण्यात येत असल्याचा आरोपही समितीने केला आहे. अशा चुकीच्या नोंदी तातडीने रद्द करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

'शेतकरी मेळावा अपडेट

संघर्षयोध्दा जरांगे पाटील यांचे उपोषण थांबवा : आमदार रत्नाकर गुट्टे व आमदार राजेश विटेकर यांच्याद्वारे मुख्यमंत्र्यांना साकडे

परभणी,/प्रतिनिधी : संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्ट पासून सुरु केलेले बेमुदत उपोषण हे मराठा आरक्षणा संदर्भातील मागण्या मान्य करीत तात्काळ थांबवावे, अशी मागणी आमदार रत्नाकर गुट्टे व आमदार राजेश विटेकर यांनी मुख्यमंत्र्यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली.

मराठा आरक्षणाचा प्रश्न हा केवळ राजकीय विषय नाही, लाखो मराठा कुटूंबियांच्या भवितव्याचा, तरुणांच्या शिक्षणाचा, रोजगाराचा आणि त्यांच्या स्वप्नाचा बनला आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे माणुसकी आणि सामाजिक संवेदनशीलतेच्या भूमिकेतून पाहणे गरजेचे आहे. ओबीसी समाजाच्या विद्यमान आरक्षणाला कोणताही धक्का लागू नये, ही भूमिका अत्यंत स्पष्ट आहे. ओबीसी समाजाच्या हक्कांवर अन्याय करुन मराठा समाजास आरक्षण मिळावे, अशी मराठा समाजाचीही भूमिका नाही. सलोखा, बंधूभाव आणि सामाजिक समतोल कायम ठेवून मराठा समाजाच्या मागण्यांवर मार्ग काढणे काळाची गरज आहे, असे या दोघांनी या निवेदनातून म्हटले आहे.

मनपा आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांची माणुसकीच्या नात्यातून दखल घ्या : भीम आर्मी संघटनेद्वारे जिल्हा प्रशासनासह सरकारला साकडे

परभणी,प्रतिनिधी : महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांसह कामगारांनी गेल्या सहा महिन्यांपासूनच्या थकीत वेतनासह अन्य मागण्यांसंदर्भात सुरु केलेल्या आंदोलनाची जिल्हा प्रशासनासह राज्य सरकारने तात्काळ दखल घ्यावी व मानवी दृष्टीकोन समोर ठेवून तोडगा काढावा व आंदोलनकर्त्या कर्मचाऱ्यांसह सर्वसामान्य नागरीकांनाही दिलासा द्यावा, अशी मागणी भीम आर्मी संघटनेचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर बनसोडे यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांनी जिल्हा प्रशासनास सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

गेल्य २४ दिवसांपासून हे आंदोलन सुरु आहे. त्या आंदोलनामुळे आंदोलनकर्त्यांसह कुटूंबियांमध्ये मोठी अस्वस्थता आहे. विशेषतः त्यांच्यासह कुटूंबियांवर अक्षरशः उपासमारीची वेळ आली आहे. दैनंदिन संसार चालवावा तरी कसा, व अन्य जबाबदाऱ्या पार तरी कशा पाडाव्यात? असा प्रश्न आ वासून उभा राहिला आहे. त्यामुळे या आंदोलनकर्त्यांकडे मानवी दृष्टीकोनातून पाहणे गरजेचे आहे. अन्यथा कायमस्वरुपी व कंत्राटी कामगारांसमोर मोठे संकट उभे राहील, मुलांचे शिक्षण व भविष्य अंधारात येईल, असा इशारा दिला. सणा-सुदीच्या काळात या आंदोलनकर्त्यांवरील हे संकट तसेच महापालिका हद्दीतील सर्वसामान्य नागरीकांवरील गंडांतर टाळण्याकरीता प्रशासनाने तातडीने हालचाली सुरु कराव्यात, असे जिल्हाध्यक्ष बनसोडे यांनी म्हटले.

मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ सोनपेठ कडकडीत बंद

सोनपेठ,/प्रतिनिधी : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषणास बसलेले मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ गुरुवारी सोनपेठ शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा दर्शविण्यासाठी व्यापारी, व्यावसायिक तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपापली दुकाने व व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद ठेवली.

नागरिकांनीही शांततेच्या मार्गाने बंद पाळत मराठा आरक्षणाच्या मागणीला आपला पाठिंबा दर्शविला. आरक्षणाच्या प्रश्नावर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. दरम्यान, बंदच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस प्रशासनाकडून शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा आणि संवेदनशील ठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार यांच्याविरुध्दची निलंबनाची कारवाई रद्द : त्यांना पुन्हा जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून पदस्थापना

परभणी,/प्रतिनिधी : जिल्हा स्त्री रुग्णालयात प्रसुती दरम्यान एका महिलेसह बाळाच्या मृत्यूच्या प्रकरणात जिल्हा शल्य चिकित्स डॉ. नागेश लखमावार यांना राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने निलंबित केले होते. परंतु, डॉ. लखमावार यांच्या विरुध्दची निलंबनाची कारवाई सार्वजनिक आरोग्य विभागाने रद्द करीत त्यांना पुन्हा जिल्हा शल्य चिकित्सक परभणी या मूळ पदावर पदस्थापना द्यावयाचा आदेश लागू केला आहे.

जिल्हा स्त्री रुग्णालयात प्रसुतीसाठी दाखल केलेल्या एका महिलेसह बाळाच्या मृत्यू प्रकरणात आरोग्य विभागाच्या चौकशी पथकाने रुग्णवाहिकेच्या चालकांसह संबंधित वैद्यकीय अधिकारी तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. लखमावार यांच्याविरुध्दसुध्दा कारवाई केली. परंतु, याच विभागाने डॉ. लखमावार यांना या प्रकरणातील निलंबनाची कारवाई रद्द करीत पुन्हा पदस्थापना दिली. त्यामुळे या विषयात आता अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्याची उत्तरे अनुत्तरीत आहेत.

विज्ञान नाट्योत्सवात नूतन विद्यालयाला तृतीय क्रमांक : 'एआयचा जादुई दिवा' बालनाटिकेचे सादरीकरण; बालकलाकारांच्या अभिनयाला दाद

सेलू,/प्रतिनिधी : सेलू पंचायत समिती शिक्षण विभागाच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने गटशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील कै. रा. ब. गिल्डा सभागृहात बुधवारी (दि. २) तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या या स्पर्धेत तालुक्यातील १२ शाळांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत नूतन विद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला.

नूतन विद्यालयातील मराठी विषयाचे सहशिक्षक डॉ. सुरेश हिवाळे लिखित व दिग्दर्शित 'एआयचा जादुई दिवा' या विज्ञान बालनाटिकेने परीक्षकांची दाद मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. या नाटिकेची संकल्पना विज्ञान विषयाचे सहशिक्षक गोपाल आम्ले यांची असून सहदिग्दर्शन सुनीता दहिफळे यांनी केले. नेपथ्य किशोर कटारे यांनी, तर संगीत संयोजन सच्चिदानंद डाखोरे यांनी केले. या नाटिकेत जय चौधरी, तीर्थेश संघई, सोहम नेवरेकर, ऋतुजा महाजन, आर्या कुलकर्णी, शब्दा लाटकर, सान्वी हेलसकर आणि मृण्मयी इक्कर या बालकलाकारांनी प्रभावी अभिनय सादर केला. त्यांच्या अभिनयाला उपस्थित प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या नाटिकेच्या यशस्वी सादरीकरणासाठी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. काशिनाथ पल्लेवाड, आरती कदम, अश्विनी केंद्रे, अरुण रामपुरकर, दिलीप जाधव तसेच विद्यार्थी शाश्वत संघई आणि गार्गी आखनीकर यांनी विशेष पुढाकार घेतला. स्पर्धेस जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परभणीचे ज्येष्ठ अधिव्याख्याता गणेश शिंदे आणि विषयतज्ज्ञ प्रसन्न भावसार यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले.

'प्लॅटफॉर्म कुठे आहे?'; पूर्णा रेल्वे स्थानकावर प्रवाशांची तारांबळ!

दिशादर्शक फलकांचा अभाव; रेल्वे प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा प्रवाशांना फटका

सेलू,/प्रतिनिधी- पूर्णा रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या मार्गदर्शनासाठी आवश्यक असलेल्या प्लॅटफॉर्म दिशादर्शक फलकांचा अभाव असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. स्थानकावर दाखल झाल्यानंतर 'प्लॅटफॉर्म कुठे आहे?' असा प्रश्न अनेक प्रवाशांसमोर निर्माण होत असून, गाडीची वेळ जवळ आली की प्रवाशांची अक्षरशः तारांबळ उडत आहे. पूर्णा हे रेल्वेच्या दृष्टीने महत्त्वाचे स्थानक असून येथे विविध ठिकाणी जाण्यासाठी प्रवाशांची मोठी वर्दळ असते. मात्र, स्थानक परिसरात प्लॅटफॉर्म क्रमांक व त्या दिशेने जाणारा मार्ग स्पष्टपणे दर्शविणारे ठळक दिशादर्शक फलक नसल्याने पहिल्यांदा येणाऱ्या प्रवाशांना प्लॅटफॉर्म शोधण्यासाठी इकडे-तिकडे भटकावे लागत आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी परिस्थिती अधिकच त्रासदायक ठरत असून, सामान घेऊन येणारे प्रवासी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच बाहेरगावाहून आलेल्या प्रवाशांना मार्ग शोधताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. रेल्वेची वेळ जवळ आलेली असताना प्लॅटफॉर्मचा मार्ग स्पष्ट न मिळाल्याने गाडी चुकण्याचीही भीती प्रवाशांमध्ये निर्माण होत आहे. रेल्वे स्थानकावर प्रवाशांना मूलभूत मार्गदर्शन करणारे फलक लावणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असताना त्याकडे दुर्लक्ष का? असा सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे. रेल्वे प्रशासनाकडून स्थानकाच्या विविध सुविधांकडे लक्ष दिले जात असले, तरी प्रत्यक्ष प्रवाशांच्या दैनंदिन अडचणींकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. तातडीने दिशादर्शक फलक बसविण्याची मागणी पूर्णा रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक,पादचारी मार्ग, तिकीट घर,प्रवेश-निर्गमन मार्ग आदींची माहिती देणारे मोठे, स्पष्ट व सहज दिसणारे दिशादर्शक फलक तातडीने बसवावेत, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांची होणारी गैरसोय गांभीर्याने घेऊन याबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सलग ३० दिवस पावसाचा खंड; नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या-रवि चव्हाण

परभणी,/प्रतिनिधी- परभणी जिल्ह्यात सलग ३० दिवस पावसाचा खंड पडल्याने खरीप पिकांसह बागायती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत व विविध सवलती देण्यात याव्यात, अशी मागणी पंचायत समिती परभणीचे सभापती रवि उत्तमराव चव्हाण यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पावसाअभावी सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, केळी, हळद, ऊस तसेच इतर बागायती पिकांवर मोठा परिणाम झाला असून शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नुकसानग्रस्त खरीप, कोरडवाहू, हंगामी व बागायती पिकांचे तातडीने पंचनामे करून / निकषांनुसार आर्थिक मदत द्यावी, तसेच परभणी जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करून दुष्काळी सवलती लागू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्याचे पाणी शेवटच्या टोकापर्यंत पोहोचवावे, सुरळीत वीजपुरवठा करावा, जळालेले डीपी व रोहित्र तातडीने दुरुस्त करावेत आणि शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ तातडीने मिळवून द्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांची आर्थिक अडचण लक्षात घेता प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता तातडीने निर्णय घेऊन मदत करावी, अशी मागणी सभापती रवि उत्तमराव चव्हाण यांनी केली आहे.यावेळी सर्व जांब महसूल मंडळातील व परभणी तालुक्यातील सरपंच व शेतकरी उपस्थित होते

व्यवस्थापक विलास कदम यांच्यासह कर्मचाऱ्यांचा सत्कार; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

संपत तेली

पूर्णा,/प्रतिनिधी- लोककल्याण नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, पूर्णा यांची २८वी वार्षिक अधिमंडळ सभा उत्साहात संपन्न झाली. यावेळी पतसंस्थेच्या प्रगतीत योगदान देणारे व्यवस्थापक विलास कदम, कर्मचारी हरीचंद्र रोडगे तसेच सभासदांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

व्यवस्थापक विलास कदम यांनी पतसंस्थेच्या कामकाजाचे नियोजन, कर्जवसुली व विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. बंद पडलेल्या मलकापूर बँकेतील पतसंस्थेच्या २८ लाख ६ हजार १०० रुपयांच्या अडकलेल्या ठेवी परत मिळवून देण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याचे विशेष कौतुक करण्यात आले. विधितज्ज्ञ व संचालक शिवप्रसाद सोनी यांच्या हस्ते विलास कदम यांचा, तर सामाजिक कार्यकर्ते गिरीश कदम यांच्या हस्ते हरीचंद्र रोडगे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. सभेचे सूत्रसंचालन प्रा. गंगाधर साखरे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. बालाजी शिंदे, वार्षिक अहवालाचे वाचन विश्वनाथराव भायेकर यांनी केले. अध्यक्षीय समारोप अध्यक्ष वसंत कदम यांनी केला. संचालक व्यंकट मुळे यांनी आभार मानले. सभेला पदाधिकारी, संचालक, सभासद, कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना ग्रंथालयाशी जोडून वाचन चळवळ गतिमान करा

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे प्रतिपादन, मुख्याध्यापकांची बैठक

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ३ सप्टेंबर

शालेय जीवनातच विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. पुस्तके माणसाच्या विचारांना प्रगल्भ करतात आणि जीवनाला नवी दिशा देतात. त्यामुळे हिंगोलीतील नूतन जिल्हा ग्रंथालय इमारतीमधील सर्व सोयी-सुविधांचा शालेय विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून द्यावा. शाळांनी विद्यार्थ्यांना थेट ग्रंथालयाशी जोडून त्यांच्यात वाचनाची घट्ट नाळ निर्माण करावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या महसूल कॉलनीतील नूतन व सुसज्ज इमारतीच्या सभागृहात आज गुरुवार, ३ सप्टेंबर रोजी हिंगोली शहरातील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांची विशेष नियोजन व आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून ते मार्गदर्शन करत होते. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून उपशिक्षणाधिकारी श्री. साखरकर, जिल्हा ग्रंथालय संघ हिंगोली तथा मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता पुढे म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांचा स्क्रीन टाईम वाढत असताना त्यांना पुन्हा पुस्तकांकडे वळवणे ही काळाची गरज आहे. ग्रंथालयात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकेच नव्हे, तर शांत व पोषक वातावरण उपलब्ध होते. प्रत्येक शाळेने दर आठवड्याला रोटेशन पद्धतीने आपल्या विद्यार्थ्यांची 'ग्रंथालय अभ्यास भेट' घडवून आणावी. तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, करिअर काउन्सिलिंग, पुस्तक परीक्षण, कथाकथन व सुलेखन यांसारख्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांमध्ये शाळांनी सक्रिय सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात मोलाचा हातभार लावावा. ग्रंथालयाच्या माध्यमातून सुरू होणाऱ्या सर्व उपक्रमांचा शहरातील प्रत्येक विद्यार्थ्याने लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हा ग्रंथालय कार्यालय नूतन इमारतीमध्ये स्थलांतरित झाल्यानंतर या अद्ययावत इमारतीतील ग्रंथालयाचे पहिले वाचक सभासद होण्याचा बहुमान डॉ. प्रकाश अंभोरे यांना मिळाला. याप्रसंगी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते डॉ. प्रकाश अंभोरे यांना ग्रंथभेट व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला व ग्रंथालयाशी जोडल्याबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले.

आगामी शिक्षक दिनाचे औचित्य साधून जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात 'ग्रंथप्रदर्शना'चे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत, शहरातील सर्व शिक्षक व मुख्याध्यापकांच्या प्रतिनिधी म्हणून कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, हिंगोली येथील मुख्याध्यापिका श्रीमती वंदना रामदास विश्वकर्मा यांच्या शुभहस्ते ग्रंथपूजन व फीत कापून करण्यात आले. हे ग्रंथप्रदर्शन पुढील आठवडाभर सर्व नागरिक, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जिल्हा ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक यांनी बैठकीचा मूळ उद्देश स्पष्ट केला. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह उपस्थित सर्व मान्यवरांचे ग्रंथभेट देऊन स्वागत केले. नूतन इमारतीतील आधुनिक वाचन कक्ष, समृद्ध संदर्भ विभाग, बाल विभाग व ई-लायब्ररी या सर्व अद्ययावत सुविधांची माहिती त्यांनी दिली. शहरातील सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने ग्रंथालयाचे नियमित सभासद व्हावे तसेच आठवडाभर चालणाऱ्या ग्रंथप्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांनी केले. या बैठकीस शहरातील जिल्हा परिषद, शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी शाळांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षकवृंद, वाचकप्रेमी व ग्रंथालय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नारीशक्ती सहकारिता संमेलनानिमित्त बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ३ सप्टेंबर

सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशच्यावतीने बँकींग क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या महिला पदाधिकाऱ्यांची शिर्डी येथे नारीशक्ती सहकारिता संमेलन आयोजित केले आहे. या संमेलनाच्या पूर्वतयारीकरिता जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील महिला पदाधिकारी व जिल्हा कार्यकारणीची बैठक नुकतीच पार पडली.

येथील तिरूपती नगरातील ओमप्रकाश देवडा पिपल्स को ऑप बँकेच्या मुख्य कार्यालयात बुधवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपनिबंधक सुरेखा फुफाटे, सहप्रकोष्ट प्रमुख जनकराज खुराणा, नांदेडचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर महाजन, महिला जिल्हाप्रमुख सीमा अतनूरकर यांची उपस्थिती होती. सहकार भारतीतर्फे शिर्डी येथील साई आश्रम भक्त निवासामध्ये महिला पदाधिकारी यांच्यासाठी दोन दिवशीय नारीशक्ती सहकारिता संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाच्या माध्यमातून राज्यातील महिला सहकार चळवळीची भावी दिशा ठरवणारे चिंतन, प्रशिक्षण व नेटवर्कींग व्यासपीठ निर्माण करावे हा संकल्प आहे. तसेच सहकारी संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधीत्व वाढविणे हा उद्देश आहे. राज्यातील विविध सहकारी संस्थांमध्ये कार्यरत महिला प्रतिनीधींची उपस्थिती राहणार आहे.

या संमेलनात भारतातील महिलांचे सहकार व महिलांची भूमिका, सहकारातून महिला सक्षमीकरण, सहकारातून समृध्द भारत या संकल्पनेत महिलांचे योगदान, विकसित भारत २०४७ मध्ये महिला सहकाराची भूमिका, महिला नेतृत्व आणि सहकारी प्रशासन, सहकारी संस्थांमध्ये महिलांचे नेतृत्व संचालक मंडळातील प्रभावी भूमिका व निर्णय प्रक्रियेत सहभाग, कृषी सहकार महिला शेतकरी व महिला शेतकरी उत्पादन कंपन्या, महिला बचतगट ते सशक्त सहकारी संस्था यशस्वी मॉडेल्स, सहकार आणि महिला उद्योजकता, महिला उद्योजकांसाठी विशेष वित्त पुरवठा योजनांची आवश्यकता आदी प्रमुख विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या संमेलनाला पतसंस्थेतील पदाधिकारी, संचालक, महिला बचतगटांच्या सदस्या यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष प्रकाशचंद सोनी, महामंत्री सुनील सिन्हा, निलेश लाखकर, महिला जिल्हाप्रमुख क्रिष्णा रूहाटिया यांनी केले आहे.

हळदीच्या कार्यक्रमात दोन गटांत हाणामारी, गुन्हे दाखल

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ३ सप्टेंबर

हिंगोली शहरातील बावनखोली भागात हळदीच्या कार्यक्रमात नाचण्याच्या कारणावरून दोन गटांत तुंबळ हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. शहर पोलिस ठाण्यात परस्परविरोधी तक्रारीवरून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या परिसरात पोलिसांनी चोख पोलिस बंदोबस्त लावला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार शहरातील बावनखोली भागात विवाह समारंभापूर्वी हळदीचा कार्यक्रम होता. बुधवार दि २ सप्टेंबर रोजी रात्रीच्या वेळी हळदीचा कार्यक्रम सुरू होता. यावेळी काही तरूण नाचत असतांना एकमेकांना धक्का लागला. यावेळी शेख खालिद व सिध्दांत कसबे यांच्यात वाद सुरू झाला. यामध्ये किरकोळ कारणावरून सुरू झालेला वाद हाणामारीपर्यंत पोहोचला.

यावेळी झालेल्या हाणामारीत शेख खालीद व सिध्दांत कसबे यांच्या पोटात, मानेवर खंजरने वार झाल्याने ते जखमी झाले तसेच शेख इरफान यास लोखंडी कड्याने मारहाण झाल्याने तो देखील जखमी झाला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. या घटनेची माहीती मिळताच पोलिस उपाधिक्षक सतीश वाघ, पोलिस निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकूर,सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद बनसोडे, सपोउपनि संजय मार्के, जमादार अशोक धामणे, गणेश लेकुळे यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या मारहाणीतील जखमींना उपचारासाठी शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी सिध्दांत कसबे यांच्या तक्रारीवरून शेख इरफान, शेख उमेर, शेख साजीद, शेख इरशाद, शेख खालीद, समीर ताजू व इतर ९ जणांवर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याच प्रकरणात शेख खालीद यांच्या तक्रारीवरून सिध्दांत कसबे, सुशील कसबे, लल्ला कसबे, ज्ञानेश्वर कसबे यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते परंतु पोलिसांनी वेळीच परिस्थिती हाताळली आहे.

हिंगोली- येथील नूतन जिल्हा ग्रंथालयाच्या इमारतीमध्ये ग्रंथालय प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, वंदना विश्वकर्मा आदी. छाया- विजय गुंडेकर

संक्षिप्त वृत्त

सांदीपनीमध्ये अ.भा.विज्ञान मेळावा संपन्न

हिंगोली-सांदीपनी पब्लिक स्कूल, सुनिल नगर, तरोडा (बु.), नांदेड येथिल शाळेत अखिल भारतीय विदयार्थी विज्ञान मेळावा उत्साहान संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षणाधिकारी माधव सलगर सर शिक्षण विस्तार अधिकारी कृष्णकुमार कराले व पं.स. नांदेडचे प्रतिनिधी संजय भालके या सर्वाच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. भावी वैज्ञानिकांना विचारांच्या आदान प्रधानाची संधी उपलब्ध करून देणे देशात विखुरलेच्या प्रज्ञावान युवकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिगंत करणे ही उदिष्टे समोर ठेवून या विज्ञान मेळाव्याचे आयोजन केले होते. या स्पर्धेत नांदेड शहरातील एकूण १४ शाळेनी भाग घेतला होता. या स्पर्धेत रणविरसिंग ठाकूर सैनिकी स्कूल, सगरोळी यास प्रथम पारितोषिक व सायली जोशी जिल्हापरिषद हायस्कूल माळकौठा हीस द्वितीय पारितोषिक देण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांचे प्रमुख पाहुण्यांचे हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला. यास परीक्षक म्हणून सुभाष देगलूरकर सौ. क्षमा करजगांवकर हे होते, तसेच शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड सौ माहेश्वरी मुकुल राठोड, शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उप मुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर यांची प्रमुख उपस्थिती होती या कार्यक्रमास शाळेतील विज्ञान विषयाचे सहशिक्षक काळेश्वर पावडे, चंद्रकांत लुंगारे, गोविंद पांचाळ, संग्राम पवार यांचे सहकार्य मिळाले तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जोगदंड खंडू यांनी केले.

माजी केंद्रीय मंत्री भगवंत खुब्बा यांनी घेतले ज्योर्तिलिंग नागनाथाचे दर्शन

हिंगोली- कर्नाटकातील बिदर लोकसभा मतदारसंघ भाजपचे मा.खा.भगवंत खुब्बा, माजी केंद्रीय राज्यमंत्री, रसायने, खते, नविनीकरण ऊर्जा भारत सरकार, नवी दिल्ली यांनी गुरुवारी (ता.०३) आठवे ज्योतिर्लिंग नागनाथ प्रभूचे दर्शन घेऊन महापूजा केली. महापूजा झाल्यानंतर देवस्थानच्या वतीने नागनाथ मंदिराची प्रतिमा देऊन सत्कार केला. यावेळी देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार,पोलीस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, सुरक्षा गार्ड प्रमुख बबन सोनुने, प्रवीण जोशी, रामप्रसाद उदगिरे, कृष्णा पाटील, नागेश माने आदी उपस्थित होते. पोलीस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे, सपोनी शेख आयुब, पो कॉ ज्ञानेश्वर सावळे, संतोष पवार, अमोल चव्हाण,राजकुमार कुटे ,विजय कालवे, वसंत चव्हाण, जयदीप जाधव, किशोर पारिसकर यांनी कडक बंदोबस्त ठेवला होता.

दराडे विद्यालयाची अंजली ढगे तालुकास्तरीय विज्ञान मेळाव्यात द्वितीय

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २ सप्टेंबर

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय, हिंगोली येथील विद्यार्थिनी कु. अंजली दिनकर ढगे हिने अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा २०२६ अंतर्गत आयोजित तालुकास्तरीय विज्ञान मेळाव्यात द्वितीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले.

विज्ञान मेळाव्याचा मुख्य विषय 'भारतीय ऊर्जा क्षेत्र २०४७ : भविष्याचा वेध-संधी आणि आव्हाने' हा होता. या विषयावर अंजलीने अभ्यासपूर्ण मांडणी करत भारताच्या भविष्यातील ऊर्जा क्षेत्रातील संधी, आव्हाने आणि बदलत्या ऊर्जा गरजांचा वेध घेतला. तिच्या आत्मविश्वासपूर्ण व प्रभावी सादरीकरणाने परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे व उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार यांनी अंजलीचा पुष्पहार घालून सत्कार केला. विज्ञान मेळाव्याच्या तयारीसाठी विद्यालयातील विज्ञान व गणित विषयाच्या सर्व अध्यापकांनी तिला मार्गदर्शन केले. अंजली ढगे तसेच मार्गदर्शन करणाऱ्या अध्यापकांचे भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. मदन मार्डीकर, सचिव ॲड. गयबाराव नाईक तसेच संस्थेच्या सर्व संचालकांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

महावितरण कंत्राटदारांच्या शैक्षणिक प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २ सप्टेंबर

महावितरणच्या विविध कामांचे कंत्राट मिळविताना कंत्राटदारांनी सादर केलेल्या शैक्षणिक, तांत्रिक शैक्षणिक प्रमाणपत्रांची संबंधित विद्यापीठ, तांत्रिक शिक्षण मंडळ व सक्षम प्राधिकरणामार्फत अधिकृतरीत्या पडताळणी करावी. बनावट कागदपत्रे आढळल्यास संबंधित कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करून लागू कायद्यानुसार फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिलच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबत मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री, ऊर्जा विभागाचे अपर मुख्य सचिव, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तसेच प्रादेशिक व विभागीय अधिकाऱ्यांना ई-मेलद्वारे निवेदन सादर करण्यात आले आहे.

महावितरणच्या विविध काम साठी निविदा काढताना कंत्राटदारांकडून शैक्षणिक पात्रता, तांत्रिक प्रमाणपत्रे, अनुभव तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्रे आदी कागदपत्रे मागविली जातात. हिंगोली जिल्ह्यात काही कंत्राटदारांनी परराज्यातील संस्थांची संशयास्पद अथवा बनावट शैक्षणिक कागदपत्रे सादर करून कामे मिळविल्याचा संशय असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे प्रमाणपत्रांवरील विद्यापीठ अथवा बोर्ड, शाखा, रोल नंबर, सीट नंबर, उत्तीर्ण वर्ष व प्रमाणपत्र क्रमांक यांची संबंधित संस्थांकडून थेट पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच कंत्राटदारांनी अनुभव व तांत्रिक पात्रतेसाठी सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची तपासणी करून प्रत्यक्ष कामावर नियुक्त मनुष्यबळाची शैक्षणिक व तांत्रिक पात्रताही तपासावी, असे निवेदनात म्हटले आहे.

बनावट प्रमाणपत्रे आढळल्यास कंत्राटदाराची नोंदणी व कंत्राट रद्द करून नियमानुसार फौजदारी कारवाई करावी तसेच चौकशीचा अहवाल निवेदकास लेखी स्वरूपात द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनावर संस्थापक अध्यक्ष शेख नईम शेख लाल, राष्ट्रीय संचालक शेख नौमान नवेद नईम यांच्यासह पदाधिकारी व स्वयंसेवकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

जिल्हा वार्षिक निधी मागणीचे प्रस्ताव सादर करा- जिल्हाधिकारी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ३ सप्टेंबर

जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना सन २०२६-२७ अंतर्गत निधी मागणीचे परिपूर्ण प्रस्ताव तात्काळ सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा वार्षिक योजनेच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते. निधी प्राप्त करून घेण्यासाठी संबंधित विभागांनी कामांचा युनिक आयडी (चक्णाखू) तयार करावा. त्यानंतर संकेतस्थळावर प्रशासकीय मान्यता (अअ) तसेच तांत्रिक मान्यता अपलोड करावी. विविध विकास योजनांतील निधी वितरणासाठी संबंधित विभागांनी प्रस्ताव आय-पास प्रणालीवर अपलोड करणे अनिवार्य आहे. प्रस्ताव अपलोड न केल्यास निधी वितरित केला जाणार नाही. वितरित निधीचा विहित कार्यपद्धतीनुसार काटेकोरपणे वापर करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या.

बैठकीत सन २०२६-२७ च्या वार्षिक योजनेचे प्रारूप आराखडे तात्काळ सादर करण्याबाबतही निर्देश देण्यात आले. नवीन कामांना प्रशासकीय मान्यता, निधी वितरण प्रक्रिया, सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना, पायाभूत सुविधा प्रकल्पांना युनिक आयडी देणे प्रस्ताव आदी बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

शिक्षण विभागांतर्गत शाळांच्या वर्गखोल्यांची दुरुस्ती तसेच आदर्श शाळा बांधकामाची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. जिल्ह्यातील मोठ्या शाळांमध्ये सुसज्ज व्यायामशाळा उभारण्यासाठी व्यायामशाळेची खोली आणि आवश्यक साहित्य यांचा समावेश असलेले एकत्रित प्रस्ताव सादर करावेत, असेही त्यांनी सांगितले. काम सुरू करण्यापूर्वीची तसेच काम पूर्ण झाल्यानंतरची छायाचित्रे सादर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रस्तावामध्ये करण्यात येणाऱ्या कामाचा तपशील तसेच कामाची सद्यस्थिती स्पष्टपणे नमूद करावी, असे निर्देश देत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्हा परिषद, आरोग्य, नगरविकास, शिक्षण, जलसंधारण, महिला व बाल विकास, महावितरण यासह विविध विभागांच्या प्रस्तावित व प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेतला.

समगा येथे आज गोकुळाष्टमी निमित्त विविध कार्यक्रम

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ३ सप्टेंबर

हिंगोली तालुक्यातील दरवर्षी प्रमाणे याही वर्षी समगा येथील श्री राधाकृष्ण मंदिर येथे गोकुळाष्टमीच्या निमित्तानेकार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

हनुमान संच भजनी मंडळी, भारुडी भजन संच मंडळी पाळोदी येथील आयोजित केलेले आहे गायक पांडुरंग मोरे, रामप्रभू वायकुळे, बाबुराव शिंदे बाजीराव बोबडे, विष्णु शिंदे, वामनराव गाडे, भुजंग टवले, तात्याराव शिंदे, दिनकर शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे विठ्ठल शिंदे, दिलीप वायकुळे, बबन वायकुळे ही सर्व संच गोकुळाष्टमी निमित्त कार्यक्रम सादर करणार आहेत. या कार्यक्रमास सर्व गावकऱ्यांना परिसरातील भाविकांनी गोकुळाष्टमी निमित्ताने हा कार्यक्रम आयोजित केला आहे. दुसऱ्या दिवशी शनिवार भावी मिरवणूक कृष्णा मंदिर ते हनुमान मिरवणूक काढण्यात येईल तरी परिसरातील भाविकांनी कार्यक्रमाचा आवश्यक लाभ घ्यावा व तसेच काल्याची कीर्तन होईल दहा ते बारा ह भ प जगन महाराज हिवरेकर तालुका वसमत येथील आहेत गायनाचार्य, मृदंगाचार्य प्रदीप महाराज सरकटे ह भ प पांडुरंग महाराज, नारायण महाराज, शिवाजी रुस्तम वाडेकर, बबन महाराज, विठ्ठल कुरवाडे विठ्ठल खोडवे, तुकाराम सरकटे, सोनाजी सरकटे, ह भ प कमलाकर महाराज गुलाब महाराज कमळाजी चव्हाण, बापूराव मखमले व तसेच भजनी मंडळी हे उपस्थित राहणार आहेत.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

मराठा समाजाच्या मागण्यांसाठी शिरूर अनंतपाळ कडकडीत बंद

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ३ सप्टेंबर : मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या सर्व मागण्या शासनाने मान्य कराव्यात, या मागणीसाठी गुरुवारी शिरूर अनंतपाळ तालुका व शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले. या पुकारलेल्या बंदला स्थानिक व्यापाऱ्याकडून अतिशय उत्स्फूर्त असा प्रतिसाद भेटला.

बंदला नागरिक, युवक तसेच विविध कार्यकर्त्यांनी प्रतिसाद दिला. यावेळी तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शासनाने समाजाच्या मागण्यांबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.

दरम्यान, शिष्टमंडळाच्या वतीने तहसीलदार आणि डी.वाय.एस.पी. यांना निवेदन देण्यात आले. मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन त्यावर लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी विनंती निवेदनातून करण्यात आली. याप्रसंगी शिरूर अनंतपाळ तालुक्यातील डॉ. प्रशांत पाटील सर, बालाजी जाधव सर, बाळासाहेब पाटील, अमर माझे पाटील, धोंडीराम शिंदे, अशा अनेक मराठा व मराठा हित चिंतक कार्यकर्त्याकडून याप्रसंगी उपस्थिती लावण्यात आली.

आंदोलना दरम्यान कार्यकर्त्यांनी शांततेच्या मार्गाने आपल्या भावना व्यक्त करत शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा याप्रसंगी सर्वांकडून व्यक्त करण्यात आली.

विविध वृत्त.....

एसटी बसमध्ये सवलतीचे मॅन्युअल तिकीट ३० सप्टेंबर पर्यंत ग्राह्य धरणार

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ सप्टेंबर : एसटी महामंडळात मे. ईबिक्स कॅश कंपनीमार्फत तिकीट व ई-तिकीट प्रणालीची कार्यवाही करण्यात येत आहे. या प्रणालीमध्ये काही तांत्रिक त्रुटी आणि अडचणी येत असल्याने त्यात आवश्यक सुधारणा करण्याचे काम सध्या वेगाने सुरू आहे. यानुसार, ज्या ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांनी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी कार्ड) साठी नोंदणी केली आहे, परंतु त्यांना अद्याप प्रत्यक्ष कार्ड प्राप्त झाले नाही, अशा लाभार्थ्यांकडे एनसीएमसी कार्ड नोंदणीची पावती असल्यास ती ग्राह्य धरली जाणार आहे. अशा पावतीच्या आधारे प्रवाशांना ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत सवलतीच्या मॅन्युअल तिकिटावर प्रवास करण्याची विशेष मुभा देण्यात आली आहे.

याशिवाय, 0१ सप्टेंबर २०२६ पासून एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात आले होते. त्यामुळे प्रवाशांच्या वाढत्या संख्येमुळे आणि एनसीएमसी कार्ड कार्यप्रणालीच्या सर्व्हरवर अचानक वाढलेल्या 'हिट्स'मुळे ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांना प्रवासादरम्यान सवलतीचे तिकीट मिळण्यात तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. यावर तात्काळ उपाययोजना म्हणून ज्या ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांकडे एनसीएमसी कार्ड उपलब्ध आहे, त्यांना देखील सर्व्हरच्या समस्येमुळे अडचण येत असल्यास १४ सप्टेंबर २०२६ पर्यंत मॅन्युअल तिकिटावर सवलतीचा प्रवास करण्यास परवानगी देण्यात आली आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक यांनी दिली आहे.

अवैध सावकारीविरोधात उदगीरमध्ये सहकारी विभागाकडून झडती

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ सप्टेंबर : लातूर जिल्ह्यातील उदगीर शहर व तालुक्यातील अवैध सावकारीविरोधात सहकार विभागाने आज धडक कारवाई केली. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली पाच ठिकाणी झडती घेण्यात आली. या कार्यवाहीत आर्थिक व्यवहारांशी संबंधित दस्तऐवज, कागदपत्रे, रोकड, खाती, कोरे धनादेश, कोरे स्टॅम्प, स्थावर मालमत्तेचे खरेदीखत व इसारचिठ्ठ्या आढळून आल्या आहेत. याप्रकरणी पुढील चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आली असल्याचे उदगीरचे सहकारी संस्थेचे सहायक निबंधक महेश कच्छवे यांनी कळवले आहे.

जिल्ह्यातील अवैध सावकारीविरोधात नागरिकांनी संबंधित तालुका सहायक निबंधक, सहकारी संस्था किंवा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्या कार्यालयाकडे तक्रारी दाखल कराव्यात, असे आवाहनही श्री. कच्छवे यांनी केले आहे.

उदगीर शहर व तालुक्यातील अवैध सावकारी व्यवसायाबाबत सहकार विभागाकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २014 चे कलम १६ अंतर्गत २ सप्टेंबर २०२६ रोजी पाच ठिकाणी झडतीची कार्यवाही करण्यात आली आहे. यामध्ये साधू रामचंद्र कांबळे, पप्पू ऊर्फ सतीश पांढरे व राजीव बिरादार, फिरोजखान नामुरखान पठाण, अमोल अशोक कोल्हेकर आणि विक्रम माने यांच्या ठिकाणांचा समावेश आहे. संबंधित ठिकाणे उदगीर शहर तसेच तालुक्यातील विविध भागातील आहेत. कारवाईसाठी सहकार विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक नियुक्त करण्यात आले होते. झडती पथकांना संरक्षणासाठी उदगीर शहर व ग्रामीण पोलिस ठाण्यांतील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात आली. ही कार्यवाही जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा पोलिस अधीक्षक अमोल तांबे, सहकारी संस्थेचे लातूर विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण, जिल्हा निबंधक (सावकारी) व्ही.एल. पोतंगले, उदगीर तहसीलदार राम बोरगावकरयांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली, असेही त्यांनी कळवले आहे.

मराठा आरक्षणासाठी लातूर बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद; कडकडीत बंद

बाजारपेठा, शाळा-महाविद्यालये बंद; मोटारसायकल रॅलीतून आरक्षणासाठी एल्गार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ सप्टेंबर : मराठा आरक्षणासाठी अंतरवली सराटी येथे सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला समर्थन देण्यासाठी गुरुवारी (दि.३) सकल मराठा समाजाने पुकारलेल्या बंदला लातूर शहरासह जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातील सर्व बाजारपेठा कडकडीत बंद राहिल्याने नेहमी गजबजणारे लातूर अक्षरशः ठप्प झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

गुरुवारी सकाळी सकल मराठा समाजबांधव छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र आले. प्रारंभी त्यांनी छत्रपती शिवरायांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले त्यानंतर शिवरायांचा जयजयकार तसेच मनोज जरांगे पाटील आणि मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ घोषणांनी परिसर दणाणून सोडला. शहरात मोटारसायकल रॅली काढून शहरातील नागरिक, व्यापारी आणि व्यावसायिकांना बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

अत्यावश्यक सेवा वगळता शाळा, महाविद्यालये, शिकवणी वर्ग, आणि खासगी आस्थापनांनीही बंदला प्रतिसाद दिला. बंदची पूर्वकल्पना असल्याने शहरातील शाळा भरल्या नव्हत्या. रस्त्यांवर स्कूल बसही दिसल्या नाहीत. महाविद्यालयांमध्येही शुकशुकाट होता. एरवी गजबजणाऱ्या आडत बाजारातही सामसूम होती. बाजार समितीत सौदे निघू शकले नाहीत.

दरम्यान दुपारी समाजबांधव मोठ्या संख्येत छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुन्हा एकत्र आले व त्यांनी तेथे बैठक देत आपल्या भावनांना वाट करुन दिली. मराठा समाजाची परिस्थिती अत्यंत बिकट झाली असून अनेकांना संसाराचा गाडा चालवणे कठीण झाले आहे. पाल्यांचे शिक्षण, मुलींची लग्ने, वाढते कर्ज, नापिकी आणि व्यवस्थेकडून होणारी अडवणूक यामुळे समाज खचला आहे. हे चित्र बदलण्यासाठी आणि सन्मानाने जगण्यासाठी आरक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे सरकारने मराठा समाजाला आरक्षण द्यावे अशी मागणी केली.

मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावत चालली आहे. आता शासनाने अंत पाहू नये, अन्यथा समाजाचा संयम सुटेल व यापुढे मंत्री,लोकप्रतिनिधींच्या घरासमोरही आंदोलने होतील, असा इशाराही यावेळी त्यांनी दिला.

दरम्यान बंद शांततेत पार पडावा यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने योग्य नियोजन करण्यात आले होते. पोलिस प्रशासनानेही शहरभर मोठा बंदोबस्त तैनात केला होता. अपर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण आणि शहर उपविभागीय पोलिस अधिकारी समीरसिंह साळवे, पोलीस निरीक्षक संतोष पाटील, पीएसआय नागरगोजे हे छत्रपती शिवाजी महाराज चौकात उपस्थित होते.

सर्वांच्या सहकार्याबद्दल मानली कृतज्ञता शहरासह जिल्ह्यात सर्व स्तरांतून मिळालेल्या प्रतिसादामुळे बंद शंभर टक्के यशस्वी झाल्याचा दावा सकल मराठा समाजाने केला. बंदला सहकार्य करणाऱ्या व्यापारी, व्यावसायिक, शैक्षणिक संस्था नागरिक अशा सर्वांप्रति समाजबांधवांनी कृतज्ञता व्यक्त केली.

लातूर विभागात ग्राहकांच्या तक्रारी निवारणासाठी आता दरमहा 'डाक अदालत'

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.३ सप्टेंबर : भारतीय डाक विभागामार्फत ग्राहकांच्या तक्रारी व समस्या अधिक प्रभावीपणे आणि वेगाने सोडविण्यासाठी सप्टेंबर २०२६ पासून दरमहा 'डाक अदालत' आयोजित करण्यात येणार आहे. ग्राहकांचा अधिकाधिक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी ही डाक अदालत विभागीय, प्रादेशिक व मंडळ (सर्कल) स्तरावर अनुक्रमे दर महिन्याच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या आठवड्यात आयोजित करण्यात येईल.

या उपक्रमांतर्गत ग्राहकांना आवश्यकतेनुसार व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारेही डाक अदालतीत सहभागी होता येणार आहे. ग्राहकांना आपली तक्रार अथवा गाऱ्हाणी टपालाद्वारे, प्रत्यक्ष भेटून किंवा ोिश्रिीी.रहसारळश्र.ले या ई-मेल आयडीवर सादर करता येतील. प्राप्त तक्रारींची संबंधित कार्यालयाकडून सविस्तर तपासणी करण्यात येईल आणि शक्य असल्यास डाक अदालतीच्या वेळीच तक्रारींचे निराकरण केले जाईल, तसेच डाक अदालतीत प्राप्त सर्व तक्रारींचे १४ दिवसांच्या आत अनिवार्यपणे निराकरण करण्यात येईल.

विभागीय स्तरावरील डाक अदालत प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित केली जाणार असून, पहिल्या सोमवारी शासकीय सुट्टी असल्यास त्यानंतरच्या पुढील कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत डाक अधीक्षक कार्यालय, लातूर विभाग, लातूर प्रधान डाकघर इमारत, दुसरा मजला, महात्मा गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे ही अदालत पार पडेल. डाक अदालतीच्या दिवशी ग्राहकांना आवश्यक ते सर्व सहकार्य मिळावे, तसेच व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे होणाऱ्या कार्यवाहीचे योग्य समन्वय साधण्यासाठी लातूर मुख्य डाकघर येथे जनसंपर्क अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जात पडताळणी इमारतीवर चढून मराठा आंदोलकांचे आंदोलन

जात वैधता , एसईबीसी प्रमाणपत्रे तातडीने देण्याची मागणी; चार तासांनंतर लेखी हमीने आंदोलन समाप्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ सप्टेंबर : येथील जात पडताळणी कार्यालयात कुणबी तसेच एसईबीसी प्रमाणपत्रासाठी मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांची अडवणूक व आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोप करीत हे प्रकार बंद करावेत व मराठा विद्यार्थ्यांना विनाव्यत्यय प्रमाणपत्र दयावेत, या मागणीसाठी चार मराठा आंदोलकांनी चक्क येथील मार्केड यार्ड परिसरात असलेल्या समाजिक न्याय भवनाच्या इमारतीवर चढून बुधवारी (दि.२) लक्षवेधी आंदोलन केले. तब्बल चार तास सुरू असलेले हे आंदोलन संबधीत विभागाने मागण्यांची पुर्तता करण्याची लेखी हमी दिल्यानंतर मागे घेण्यात आले.

बुधवारी कोणालाही कल्पना न देता बालाजी जाधव, खंडू लोखंडे, आदित्य जगदाळे व वैशाली लोंढे हे चार आंदोलक मार्केट यार्ड परिसरातील सामाजिक न्याय भवनाच्या इमारतीवर चढले. त्यांनी मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी करीत मराठा विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळविताना होत असलेल्या अडचणींचा निषेध केला. अचानक झालेल्या

या आंदोलनामुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.गांधी चौक पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रेजीतवाड व त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलकांना खाली उतरण्याची विनंती केली. चर्चेतून प्रश्न मार्गी लागतील, असे पोलिसांनी सांगितले. मात्र, मागण्या मान्य होईपर्यंत खाली उतरणार नसल्याची भूमिका आंदोलकांनी घेतली. मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या कुणबी प्रमाणपत्रांच्या जात वैधता प्रमाणपत्रांचा निपटारा लवकरात लवकर करावा, कोणताही आर्थिक व्यवहार न करता पारदर्शकपणे जात वैधता प्रमाणपत्रे द्यावीत, विद्यार्थ्यांना प्राव्हिजनल (तात्पुरती) कागदपत्रे तातडीने उपलब्ध करून द्यावीत तसेच एसईबीसी जात वैधता प्रमाणपत्रे तत्काळ देण्यात यावीत, अशा प्रमुख मागण्या आंदोलकांनी केल्या.दरम्यान, मराठा समाजाचे वैजनाथ जाधव, ड. उदय गवारे यांच्यासह अन्य पदाधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलकांशी चर्चा करून

संबंधित अधिकारी मागण्यांबाबत लेखी पत्र देतील, असे सांगितले. त्यानंतर समितीने सकारात्मक भूमिका घेत वरील चारही मागण्यांच्या अनुषंगाने नियमानुसार तात्काळ योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, अशी लेखी हमी दिली.

त्यानंतर आंदोलक इमारतीवरून खाली उतरले.

श्री श्री रविशंकर विद्यालयात 'विश्व संस्कृत दिन' उत्साहात

तीन दिवसांत संस्कृत गायन, श्लोक पठण, सुभाषिते आणि भाषण स्पर्धा; २३५ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ सप्टेंबर : भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान आणि ज्ञानपरंपरेचा अमूल्य ठेवा असलेल्या संस्कृत भाषेप्रती विद्यार्थ्यांमध्ये रुची निर्माण व्हावी, संस्कृतचे शास्त्रीय व सांस्कृतिक महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचावे आणि या समृद्ध भाषेच्या जतनासाठी विद्यार्थ्यांनी पुढे यावे, या उद्देशाने श्री श्री रविशंकर प्राथमिक इंग्लिश स्कूल आणि संस्कृत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने श्री श्री रविशंकर विद्यालयात विश्र्व संस्कृत दिनानिमित्त तीन दिवस विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमध्ये तब्बल २३५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या निमित्ताने विद्यालयात संस्कृत गायन, भाषण, श्र्लोक वाचन, अध्ययन, सुभाषिते, अष्टके आणि संस्कृत गीत अशा विविध उपक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी संस्कृत भाषेतील श्र्लोक, सुभाषिते आणि गीतांचे प्रभावी सादरीकरण करून भारतीय संस्कृतीतील संस्कृतचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन राजर्षी शाहू महाविद्यालयातील संस्कृत विभागाचे प्रमुख प्रा. विनय गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे कार्यकारी समन्वयक आशिष कोळगे होते. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विनया मराठे, उपमुख्याध्यापिका विशाखा पाटील, संस्कृत विभागप्रमुख आचार्य शेरसिंह शास्त्री आणि संस्कृत अध्यापक अभिजीत भड यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्पर्धा दोन गटांमध्ये घेण्यात आल्या. पहिल्या गटातील संस्कृत गायन स्पर्धेत श्रावणी संतोष कदम हिने प्रथम, अर्जुन लालासाहेब कदम आणि कुमारी दिव्यश्री शेखर मुठे यांनी द्वितीय, तर कुमारी तनुश्री मुंडे, कुमारी श्रेया कदम आणि कुमारी गौरवी अजित कदम यांनी तृतीय क्रमांक पटकावला. उत्तेजनार्थ योग्यश्री गुट्टे आणि स्वरांजली डोळस यांना पारितोषिक देण्यात आले.

भाषण स्पर्धेत गौरवी अजित कदम हिने प्रथम, ईश्र्वरी भीमराव यादव हिने द्वितीय, तर प्रांजली कैलास गायकवाड हिने तृतीय क्रमांक मिळविला. पार्थ लक्ष्मीकांत कुलकर्णी याला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

दुसऱ्या गटातील स्पर्धांमध्ये आरवी रामगोडी हिने प्रथम, रचना जांभळे हिने द्वितीय आणि आयुष भारती याने तृतीय क्रमांक पटकावला. उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल अंकिता कांबळे, समृद्धी चव्हाण, कुमारी आराध्या वाकडे, अंकिता काळे, आनंदी पाटील, समर्थ गोडी आणि नवीन अकबर शेख यांना विशेष पारितोषिकांनी गौरविण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना संस्कृत ही केवळ एक प्राचीन भाषा नसून भारताच्या ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, साहित्य आणि संस्कृतीचा मूलभूत आधार असल्याचे नमूद केले. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, भगवद्गीता, आयुर्वेद, योग आणि विविध शास्त्रग्रंथांच्या माध्यमातून संस्कृतने जगाला समृद्ध ज्ञानपरंपरा दिली आहे. संस्कृत भाषेतील व्याकरणशुद्धता, शब्दसंपदा आणि विचारांची सुसूत्र मांडणी यामुळे आधुनिक काळातही या भाषेच्या अभ्यासाचे महत्त्व कायम असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

विश्र्व संस्कृत दिनासारखे उपक्रम विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेची ओळख करून देण्याबरोबरच तिच्याबद्दलची भीती दूर करून भाषेप्रती प्रेम आणि जिव्हाळा निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. संस्कृतचे अध्ययन केवळ गुण मिळविण्यासाठी नव्हे, तर भारतीय संस्कृती आणि ज्ञानपरंपरेचे मूळ समजून घेण्यासाठी आवश्यक आहे, असेही यावेळी सांगण्यात आले.

स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी दाखविलेल्या उत्साहाचे आणि उत्कृष्ट सादरीकरणाचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले. संस्कृत भाषा ही भूतकाळाचा केवळ वारसा नसून वर्तमानाला समृद्ध करणारी आणि भविष्याला दिशा देणारी ज्ञानभाषा आहे, असा संदेश या तीन दिवसीय कार्यक्रमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थाचालक, मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, संस्कृत विभाग, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

दत्तक विधान सूचना सादर करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ सप्टेंबर : महिला व बाल विकास मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या 'सेंट्रल अडॉप्शन रिसोर्स ऑथॉरिटी' (सीएआरए - उ-ठ-) कडून दत्तक विधान प्रक्रियेचे नियमन करणाऱ्या कायदेशीर चौकटीला अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने आणि त्यासंबंधी उद्भवणाऱ्या विविध कायदेशीर, प्रक्रियात्मक तसेच अंमलबजावणीविषयक मुद्द्यांचे योग्य निराकरण करण्यासाठी 'दत्तक विधान नियमन, २०२२' (-वेंिळेप ठशर्सीश्ररींळेपी, २०२२) चा आढावा घेतला जात आहे.

या पार्श्र्वभूमीवर 'दत्तक विधान नियमन, २०२२' मधील ज्या तरतुदींमध्ये सुधारणा करणे, नवीन तरतूद समाविष्ट करणे, विद्यमान नियमांत बदल करणे किंवा एखादी तरतूद वगळणे आवश्यक वाटत असेल, त्याबाबत सकारण अभिप्राय व सूचना सर्वसामान्य जनता, संबंधित संस्था आणि भागधारकांकडून मागविण्यात येत आहेत.

जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ औसा ,उजनीत कडकडीत बंद

तभा वृत्तसेवा

औसा दि.३ सप्टेंबर : महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या आरक्षणासाठी प्रलंबित असलेल्या मागण्या तातडीने मान्य कराव्यात यासाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या सहा दिवसांपासून अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण आंदोलन सुरू केले आहे. औसा येथे जवळपास दोन तास व तालुक्यातील उजनी येथील व्यापाऱ्यांनी व्यवसाय जवळपास दिवसभर तर शाळा, विद्यालयांनी बंद ठेवून गुरूवार दि.३ रोजी या आंदोलनास समर्थन दिले.

मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील गेल्या सहा दिवसांपासून अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणास करीत आहेत.मराठा समाजाच्या न्याय्य व प्रलंबित मागण्यांसाठी सुरू असलेल्या या आंदोलनामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील मराठा समाजामध्ये तीव्र चिंता निर्माण झाली आहे. शासनाने या आंदोलनाची गांभीर्याने दखल घेऊन मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्या लवकरात लवकर पूर्ण कराव्यात. तसेच मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती लक्षात घेऊन त्यांचे आमरण उपोषण तातडीने सोडविण्यासाठी सकारात्मक निर्णय घ्यावा.असे यावेळी दिलेल्या निवेदनातून म्हटले आहे.

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ आज लातूर जिल्हा बंदची हाक समाजाच्या वतीने देण्यात आली होती.या हाकेला साद घालून औसा शहरातील व्यावसायिकांनी दोन तासांहून अधिक काळ व्यवसाय बंद करून समर्थन दिले. उजनी येथील समर्थकांनी सकाळी बंदची हाक दिली.त्यामुळे किराणा ,कापड, पान टपरी व इतर व्यापाऱ्यांनी आज सकाळपासून व्यवसाय कडकडीत बंद ठेवून या आंदोलनास पाठिंबा दिला. सकाळच्या सत्रात शाळा, विद्यालय सुरू झाली. मात्र दुपारी १२ वा. सुमारास सुट्टी देऊन शाळा विद्यार्थ्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला.उजनीत नामदेव जाधव यांच्या नेतृत्वाखाली व दीपक वळके यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात आले.औसा, उजनी येथील आंदोलनात मराठा समाज बांधवांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.या आंदोलनात वैद्यकीय दवाखाने, मेडिकल वगळण्यात आले होते.

सोयाबीन बहरले;पावसाची गरज

तभा वृतसेवा
आदमपूर, दि. ३ सप्टेंबर -

बिलोली तालुक्यातील ग्राम गळेगांव,थडीसावळी,आदमपूर परिसरातील शेत शिवारात खरीप हंगामातील सोयाबीन, उडीद,तूर पीके बहरलेले सद्यस्थितीत दृष्टीस पडत आहेत. पण,गेल्या आठ दहा दिवसांपासून पाऊस मात्र गायब असल्याने हंगाम ऊन धरताना पाहिल्यावर या भागातील शेतकरी कासावीस असल्याचे मनाला अस्वस्थ करणारे चित्र भयाण आहे.

आष्लेशा नक्षत्रात काही प्रमाणात तुरळक रिमझिम पाऊस बरसत होता.मात्र,मघा नक्षत्रात एकही पावसाची सळक आलेली नव्हती.त्यांतच तुरळक मूग पिकांची काढणी कुणबी शेतकऱ्यांकडून घाईघाईने उरकून घेण्यात आली.उशिरा पेरणी झाल्याने आश्लेषा अर्थात 'हसळका'

नक्षत्र काही प्रमाणात कोरडा गेल्याने गरजेपुरते घातलेले मूग पीक यशस्वी झाले.याने शेतकऱ्यांना थोडाफार 'दाळदाणा' होऊन आर्थिक समाधान लाभले.

सोयाबीन पीक सद्यस्थितीत शेत शिवारात भयंकर वाढलेले आहे.परंतु,अगदी तळापासून ते शेंड्यापर्यंत शेंगाही नजरेस दिसू लागल्या आहेत.उन्हाचा कडका आहेच,सोबतीला उकाडाही वाढतो आहे. शेतकरी आता शेवटची म्हणजे तीसरी कीडनाशक फवारणी करताना दिसून येत आहेत.काही आदमपूर माळाकडील सोयाबीन पीक शेंगांनी टंच भरलेले आहे.माऊ,पाऊस उघडीप दिल्याने पीकांनी माना टाकल्या आहेत.मन्याड भागातील

रानाशिवारात खरीप पिके चांगली लुसलुशीत डोलत आहेत.पूर्वा नक्षत्र सुरू होऊन चार दिवस झाले,अजुनही पावसाची चिन्हे दिसून येत नाहीत.श्रावण मासातला हा कोरडेपणा जीवघेणा ठरल्यात जमा आहे.त्यामुळे गळेगांव, थडीसावळी,आदमपूर परिसरातील शेतकरी आजघडीला चिंतेत आहेत.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा; मागण्या तातडीने मान्य करण्याची मागणी

तभा वृतसेवा
कंधार, दि. ३ सप्टेंबर -

मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्या तातडीने मान्य कराव्यात तसेच संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी, या मागणीसाठी कंधार तालुक्यातील समस्त मराठा समाजाच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, मराठा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील हे अंतरवाली सराटी, जि. जालना येथे आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांच्या आंदोलनामुळे मराठा समाजामध्ये चिंता निर्माण झाली असून, शासनाने सकारात्मक भूमिका घेत मागण्यांबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीचा गांभीर्याने विचार करून त्यांचे आमरण उपोषण तातडीने सोडवावे, तसेच मराठा समाजाच्या न्याय्य व प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत, अशी विनंती निवेदनातून करण्यात आली.

दरम्यान, आंदोलनाच्या समर्थनार्थ नांदेड जिल्हा बंदची हाक देण्यात आल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील मराठा समाज संविधानिक व शांततापूर्ण मार्गाने आपल्या मागण्या शासनापर्यंत पोहोचवत असल्याचे सांगण्यात आले.

हे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील तसेच विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे पाठविण्याची मागणी करण्यात आली आहे.

शासनाने मराठा समाजाच्या मागण्यांबाबत तातडीने योग्य निर्णय न घेतल्यास समाजामध्ये तीव्र जनभावना व रोष निर्माण होऊ शकतो, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

भविष्यात या प्रश्नामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीस शासन जबाबदार राहील, अशी भूमिका यावेळी परमेश्वर पाटील जाधव,नितीन पाटील कोकाटे,केशव पाटील जाधव,सतीश नळगे,शहाजी पाटील,गुलाब पाटील जाधव,संदीप तोंडचिरे,त्रिभुवन मोरे,विकास पाटील गारोळे,विष्णू मोरे

अमित मोरे,संतोष बोरोळे, शिवा तोंडचिरे,देवानंद मोरे,धनंजय कौशल्ये,विठ्ठल भुते ,शंकर भुते,बालाजी काचमांडे,विकास लुंगारे,सतीश जाधव,अनिल मोरे,गजानन डांगे,व समस्त सकल मराठा समाज कंधार यांच्या वतीने मांडण्यात आली.

नगर परिषदेच्या गाळ्यांतील बेकायदा पोटभाडेकरू हटवा : सतीष नेम्मानिवार

किनवट-किनवट नगर परिषदेच्या मालकीच्या गाळ्यांमध्ये नियमबाह्य पोटभाडेकरू ठेवणे, परवानगीशिवाय गाळ्यांचे हस्तांतरण करणे तसेच लाखो रुपयांच्या व्यवहारातून गाळ्यांचा ताबा बदलणे तातडीने थांबवावे, अशी मागणी भाजपा किसान मोर्चाचे नांदेड उत्तर जिल्हा उपाध्यक्ष सतीष नेम्मानिवार यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे. नगर परिषदेने मूळ भाडेकरूंना दिलेले गाळे प्रत्यक्षात अन्य व्यक्तींकडून वापरले जात असल्याच्या तक्रारी असून, काही गाळ्यांचे २० ते ५० लाखांपर्यंत कथित व्यवहार होत असल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने सर्व गाळ्यांचे सर्वेक्षण करून मूळ भाडेकरू व प्रत्यक्ष ताबेदारांची पडताळणी करावी. नियमबाह्य पोटभाडे किंवा अनधिकृत हस्तांतरण आढळल्यास कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून गाळे नगर परिषदेकडे ताब्यात घ्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. आठवडी बाजारातील अतिक्रमणाचा मुद्दाही ऐरणीवर आला असून, काही व्यापाऱ्यांकडून मंजूर जागेपेक्षा मोठ्या क्षेत्रावर, काही ठिकाणी १०० ते २०० फूटपर्यंत जागेवर कब्जा केला जात असल्याची तक्रार आहे. बाजारातील जागांची मोजणी व सीमांकन करून अतिक्रमणे हटवावीत आणि इतर व्यापाऱ्यांना समान संधी द्यावी, अशी मागणी आहे. तसेच बाजार परिसरातील अनधिकृत कुक्कुटपालन, पक्षी विक्री आणि अस्वच्छ पद्धतीने होणाऱ्या मांस विक्रीची तपासणी करून परवाना व आरोग्यविषयक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, असेही निवेदनात नमूद आहे.अनधिकृत ताबे हटविल्यानंतर उपलब्ध होणारे गाळे, दुकाने व बाजारातील जागा सार्वजनिक जाहीरात व पारदर्शक प्रक्रियेद्वारे नवीन व गरजू व्यापाऱ्यांना उपलब्ध करून द्याव्यात. तसेच नगर परिषद मालमत्तेच्या भाडेपट्टा व हस्तांतरणासंदर्भातील लागू कायदे व २०२५ चे नियम काटेकोरपणे राबवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

किनवट तालुका बंदचे आवाहन; सकल मराठा समाजाचे पोलिसांना निवेदन

किनवट -मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी तसेच सरकारच्या निषेधार्थ शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी किनवट तालुका बंद ठेवण्याचे आवाहन सकल मराठा समाज, किनवटच्या वतीने करण्यात आले आहे. याबाबत दि. ३ सप्टेंबर रोजी किनवट पोलिस ठाण्याचे नवनियुक्त पोलिस निरीक्षक जगदीश मंडलवार यांना निवेदन देण्यात आले. निवेदनानुसार, दि. ४ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता जिजामाता चौक, किनवट येथून बंदचे आवाहन करण्यात येणार आहे. मराठा समाज बांधवांनी या बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. निवेदनावर वैजनाथ करपुडे पाटील, मारोती दिवसे पाटील, सुमित माने, प्रदीप कोल्हे, शिवानंद पवार, निरंजन गिरामे, सचिन कदम, चक्रधर मंगल व साहेबराव कदम यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

व्हॉइस ऑफ मीडियाच्या डिजिटल विंगच्या जिल्हाध्यक्षपदी शेख याहीया

नांदेड- व्हॉइस ऑफ मीडियाच्या डिजिटल विंगच्या जिल्हाध्यक्षपदी शेख याहीया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष अनिल मस्के व मराठवाडा अध्यक्ष गणेश जोशी यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. पत्रकार शेख याहीया हे १९ वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून त्यांना यापूर्वी अनेक पुरस्कार मिळाले आहेत. तर मागील १० वर्षांपासून त्यांनी युट्युब चॅनेल सुरू केले असून या माध्यमातून त्यांनी अनेकांच्या अडचणी सोडवल्या आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी त्यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे तर हे नियुक्तीपत्र त्यांना नुकतेच प्रदान करण्यात आले. यावेळी ईशान खान(जिल्हा उपाध्यक्ष), विठ्ठल पवार ग्रामीण (जिल्हा उपाध्यक्ष ग्रामीण), निळकंठ जाधव, दिगंबर शिंदे (जिल्हा सचिव), स्वाती सोनकांबळे(जिल्हा कोषाध्यक्ष), अविनाश प्रघाणे(जिल्हा कार्याध्यक्ष), किशोरकुमार वागदरीकर(जिल्हा संघटक), शुभम विश्वनाथ पांचाळ (जिल्हाध्यक्ष दक्षिण), प्रवीण कुमार शेलूकर(जिल्हाध्यक्ष उत्तर), भारत चंदर सूर्यवंशी (महानगराध्यक्ष), वेदांत कोंडावार(जिल्हा सहसचिव), मोहम्मद अली खान,(जिल्हा सहसचिव), प्रा. राज गायकवाड,(प्रसिद्धीप्रमुख),(सदस्य) सय्यद मुमताज अली, शेख बशीर लाला, सय्यद अश्फाक आदी उपस्थित होते.

रेशनच्या गोरगरीबांच्या घासात खडे-कचरा! लाभार्थ्यांमध्ये संताप

तभा वृतसेवा
बाऱ्हाळी, दि. ३ सप्टेंबर -

शासनाच्या अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत गोरगरीब व गरजू लाभार्थ्यांना दरमहा गहू, तांदूळ व साखर मोफत वितरित केली जाते. मात्र, रेशन दुकानांमधून वितरित करण्यात येणाऱ्या धान्यामध्ये काडीकचरा, बारीक खडे, जळमटे, अळ्या तसेच तांदळाचा चुरा आढळून येत असल्याचा आरोप लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे शासनाकडून मिळणारा गोरगरीबांच्या हक्काचा घासच निकृष्ट दर्जाचा मिळत असल्याने लाभार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

अन्नसुरक्षा योजनेंतर्गत अंत्योदय व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना फोर्टिफाईड तांदूळ व गहू मोफत दिला जातो. मात्र, सध्या वितरणासाठी आलेल्या धान्याची प्रत अत्यंत खराब असल्याचे लाभार्थ्यांचे म्हणणे आहे. धान्य घरी आणल्यानंतर कितीही निवडून

स्वच्छ केले तरी त्यातील कचरा व व खडे पूर्णपणे वेगळे करणे कठीण होत असल्याने हे धान्य खाण्यायोग्य आहे की नाही, असा प्रश्न लाभार्थ्यांकडून उपस्थित केला जात आहे. काही ठिकाणी हे धान्य जनावरेही खात नसल्याची माहित देण्यात येत आहे. शासनाने या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष का होत आहे, याबाबत लाभार्थ्यांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी होत आहे.

हाणेगाव कडकडीत बंद; मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला जाहीर पाठिंबा

तभा वृतसेवा
हाणेगाव, दि. ३ सप्टेंबर -

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी हाणेगाव येथे कडकडीत बंद पाळण्यात आला. गावातील व्यापारी, दुकानदार तसेच नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला.

आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन मराठा समाजाच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

बंददरम्यान हाणेगावातील विविध व्यावसायिक प्रतिष्ठाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवण्यात आली होती. गावातील प्रमुख मार्गांवरही शांततेचे वातावरण होते. आंदोलकांनी शांततेच्या मार्गाने आपला निषेध नोंदवत मराठा आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा दर्शविला.

मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला हाणेगावचा ठाम पाठिंबा असून शासनाने तातडीने योग्य तो निर्णय घ्यावा, अशी भावना यावेळी उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.यावेळी हाणेगाव परीसरातील असंख्य सकल मराठा समाज बांधव उपस्थित होते काही अनुचित प्रकार घडू नये म्हणुन मरखेल ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक रविंद्र हुंडेकर व सपोनी विलास पवार , नारायन यंगाले इतर कर्मचारी उपस्थित

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी हाणेगाव येथे कडकडीत बंद पाळण्यात आल

मुक्रमाबाद पोलिसांची गुटख्याविरोधात धडक कारवाई ;साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त

तभा वृतसेवा
मुक्रमाबाद, दि. ३ सप्टेंबर -

महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा, पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थांची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनावर मुक्रमाबाद पोलिसांनी कारवाई करत तब्बल ५ लाख ५९ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई १ सप्टेंबर रोजी लखमापूर फाट्याजवळ करण्यात आली. नांदेड जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक व विक्री करणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम सुरू आहे. या अनुषंगाने मुक्रमाबाद पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार लखमापूर फाट्याजवळ पोलिस पथकाने पंचांसह सापळा रचला.यावेळी महिंद्रा मॅक्स वाहन क्रमांक चक-२२ छ-४६७२ संशयास्पदरीत्या येताना दिसले. पोलिसांनी वाहन थांबवून पंचांसमक्ष झडती घेतली असता त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला विमल पानमसाला, व्ही-१ तंबाखू व इतर तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले. जप्त करण्यात आलेल्या प्रतिबंधित पदार्थांची किंमत ५९ हजार ७६०, तर वाहनाची किंमत सुमारे ५ लाख, असा एकूण ५ लाख ५९ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी वाहनातील संशयित मंगेश शिवाजी धोत्रे (वय २८, रा. शिवाजीनगर, मुखेड) व विशाल व्यंकटराव वाघमारे वय २८ राहणार दत्तनगर मुखेड यांच्याविरुद्ध मुक्रमाबाद पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक १३४/२०२६ नोंद करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे.ही कारवाई नांदेडचे पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशाने मुक्रमाबाद पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राजू चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलिस उपनिरीक्षक शंकर मोरे, पोलिस अंमलदार संदीप देवकत्ते, गंगावरे, लुंगारे, होमगार्ड जाधव, वसंत जाधव आदींचा पथकात सहभाग होता.नांदेड जिल्ह्यात अवैध गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू तसेच इतर प्रतिबंधित पदार्थांची वाहतूक, साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

'तरुण भारत'च्या वृत्ताची दखल; शिवाजी चौक अतिक्रमणमुक्त

तभा वृतसेवा
किनवट, दि. ३ सप्टेंबर -

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वाहतूक कोंडी व अतिक्रमणाच्या समस्येबाबत दैनिक 'सोलापूर तरुण भारत' ने प्रकाशित केलेल्या वृत्ताची नगर परिषद प्रशासनाने तत्काळ दखल घेतली. नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार, मुख्याधिकारी रोहित भगरे आणि कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव यांच्या पुढाकारातून गुरुवार, दि. ०३ सप्टेंबर रोजी सकाळी कारवाई करण्यात आली. शिवाजी चौक परिसरातील पूजा साहित्य, फुल, फळ विक्रेते तसेच विविध लहान-मोठे व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांना जुन्या नगर परिषद इमारतीमध्ये जागा उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे चौकातील रस्त्यालगतचे अतिक्रमण हटून वाहतुकीसाठी मोठी मोकळीक निर्माण झाली आहे. अतिक्रमणामुळे सातत्याने निर्माण होणारी वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असून, शिवाजी चौकाने आता 'मोकळा श्वास' घेतला आहे. नगर परिषदेच्या या तत्काळ कारवाईबद्दल शहरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करून प्रशासनाचे कौतुक केले आहे.सण-उत्सवांच्या काळातही शिवाजी चौकात पुन्हा वाहतूक कोंडी निर्माण होऊ नये, यासाठी विक्रेत्यांना उपलब्ध करून दिलेल्या जागेचे योग्य नियोजन व व्यवस्थापन कायम ठेवावे, अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली आहे.

देगलूरच्या गोर बंजारा तीज महोत्सवाला यंदा प्रथमच ३ मंत्र्यांची प्रमुख उपस्थिती लाभणार

तभा वृतसेवा
देगलूर, दि. ३ सप्टेंबर -

गोर बंजारा समाजाच्या अत्यंत पवित्र आणि श्रद्धेचा सण मानल्या जाणाऱ्या 'तीज महोत्सवा'चे यंदा देगलूर येथे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या तीज महोत्सवाच्या इतिहासात प्रथमच तीन मंत्री एकाच मंचावर उपस्थित राहणार

असल्याने, यंदाचा उत्सव ऐतिहासिक ठरणार आहे.

हा भव्य सोहळा रविवार, दिनांक २० सप्टेंबर २०२६ रोजी देगलूर येथील सेवालाल महाराज चौक येथे थाटामाटात पार पडणार आहे. या कार्यक्रमासाठी संजय राठोड (कॅबिनेट मंत्री), इंद्रनील नाईक (राज्यमंत्री), सौ.मेघनाताई बोर्डीकर(राज्यमंत्री) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहेत. गोर बंजारा संस्कृतीचे जतन आणि संवर्धन व्हावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात देगलूरसह संपूर्ण जिल्ह्यातून आणि परिसरातून हजारोच्या संख्येने बंजारा बांधव व भगिनी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती मुख्य संयोजक विशाल पवार यांनी दिली.

बंजारा समाजातील पारंपरिक वेशभूषा, तीजची गाणी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल या सोहळ्यात पाहायला मिळणार आहे. या अभूतपूर्व आणि ऐतिहासिक सोहळ्याचा साक्षीदार होण्यासाठी गोर बंजारा समाजातील सर्व बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे नम्र आवाहन आयोजन व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. या उत्सवाचे निमंत्रण देताना रामराव चव्हाण, बालाजी जाधव, सचिन जाधव, अनिल राठोड, गणेश पवार, संतोष पवार, संजय राठोड हे उपस्थित होते.